नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ११ * * अमरावती * | शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## हृदयविकाराच्या झटक्याने २३ जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. १० :
कर्नाटकातील हासनमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. गेल्या ४० दिवसांत येथे हृदयविकाराच्या झटक्याने २३ मृत्यू झाले आहेत. त्यापैकी सहा जण १९ ते २५ वयोगटातील होते. तर आठ वर्षांचे वय २५ ते ४५ वर्षांच्या दरम्यान होते.

दुसरीकडे, बंगळुरूमधील जयदेव रुग्णालयात हृदयविकाराच्या रुग्णांच्या संख्येत ८% वाढ झाली आहे. डॉक्टरांनी सांगितले की, वाढत्या रुग्णांच्या संख्येत, हसन आणि जवळच्या जिल्ह्यांमधून अनेक लोक खबरदारीच्या तपासणीसाठी येत आहेत. हृदयाशी संबंधित तपासणीसाठी दररोज हजारो लोक म्हैसूरमधील जयदेव रुग्णालयात पोहोचत आहेत.

अग्रग्रलेख

## खरीखरी..

## गायकवाड चुकलेच, पण...

परवा बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवासात कॅन्टीनच्या एक कर्मचाऱ्याला मारहाण केली. शिळे आणि निकृष्ट दर्जाचे अन्न पुरवल्यामुळे त्यांनी मारहाण केली होती. संजय गायकवाड यांचा स्वभाव थोडासा कोपिष्ट किंवा क्रोधित आहे हे स्पष्ट आहे, त्यांना ज्या गोष्टी पटत नाहीत त्याचा खरपूस समाचार ते घेतात. हे त्यांनी अनेकदा दाखवून दिलेले आहे परवाच्या प्रकरणात त्यांनी ज्या कर्मचाऱ्याला किंवा कुकला मारहाण केली त्याचे समर्थन कोणीही करीत नाही. आम्हीही अजिबात करत नाही पण या आमदार निवासातील कॅन्टीनचा आणि ते पुरवित असलेल्या अन्नाचा आणि त्याच्या गुणवत्तेचा काहीच संबंध नाही. गेल्या अनेक वर्षांपासून एकच कंत्राटदार या प्रचंड गर्दीच्या आणि अन्नपदार्थांचा प्रचंड खप होणाऱ्या मालामाल कॅन्टीनचा कंत्राटदार आहे. तो कुठला आहे कसा आहे, याच्याशी आम्हाला काहीच देणे घेणे नाही पण संजय गायकवाड यांनी जेवण मागितल्यावर जे जेवण पुरवण्यात आले. ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे होते आणि माणसाला खाण्यायोग्य नव्हते मग आमदाराला जर असे जेवण मिळत असेल तर सामान्य जनतेचे काय. या कंत्राटदाराची मग्रुरी वर्षोनुवर्ष शासकीय ठिकाणावर कशी चालते हा सुद्धा प्रश्नच आहे. संजय गायकवाड यांनी ज्या मुद्द्यावरून मारहाण केली त्यावर ते ठाम आहेत. आपण अनेकदा तक्रार केल्यावरही या कॅन्टीनच्या कंत्राटदाराने दखल घेतली नाही हे त्यांचे म्हणणे अगदी खरे आहे. असे म्हणतात की, या आमदार निवासाच्या भोजन समितीवर आमदार संजय गायकवाड सुद्धा आहेत. एक आमदार असलेली व्यक्ती आमदार निवासाच्या भोजन आणि आहार समितीवर असेल आणि त्याच आमदाराला जर असे निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असेल तर मग सामान्य जनतेचे काय? याचाच अर्थ इतक्या महत्त्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तीलाही शिळे जेवण किंवा निकृष्ट अन्न पुरवले जाते तर मग या सबबीवरून या कंत्राटदाराचा परवाना रद्दच झाला पाहिजे. सध्याची आमची माहिती अशी आहे की, या कंत्राटदाराचा परवाना निलंबित करण्यात आलेला आहे. म्हणजेच तक्रार आली की सरकारी खात्यात किंवा कारवाई म्हणून निलंबन होतच असते. निलंबन म्हणजे काही सेवासमाप्ती नाही त्यामुळे आमदार निवासचे कॅन्टीन सध्या बंद असले तरी त्या ठिकाणी येणारी जनता आहारासाठी याच कॅन्टीनवर अवलंबून आहे. जनतेच्या सौजन्याचा दुरुपयोग करून या कॅन्टीनचा कंत्राटदार वर्षानुवर्ष थर्ड क्लास माल पुरवित असतो, हे आमदार गायकवाड यांचे म्हणणे अगदी १०१% खरे आहे. आता काहीतरी कारवाई केली हे दाखवण्यासाठी त्या कंत्राटदाराचे दुकान बंद केलेले आहे. पण काही दिवसानंतर हा अजंता कॅटरर्सचा परवाना एलोरा केटरिंग नावाने सुद्धा त्यांनाच मिळणार आहे, हे तुम्ही आजच नमूद करून ठेवा. आमदार आणि सामान्य जनतेच्या पोटासाठी जर व्यवस्थित आणि चांगले अन्न मिळत नसेल तर कसे बरे चालेल. निकृष्ट दर्जाचे अन्न म्हणजे आजाराला आणि व्याधीना निमंत्रण असते. आहार नियंत्रणा संबंधित विभागाने या कॅन्टीनची संपूर्ण चौकशी कधीतरी केलेली आहे की नाही हे आम्हाला ठाऊक नाही. खानापूर्ती करण्यासाठी त्या चौकशीचे नाटक करून या कॅन्टीनचे काम एक नंबरचे आहे असा शेराही मारण्यात आला असेल. एकूण सरकारी कामातील दिरंगाई आणि लपवा-छपवीचे अर्थ न समजल्यामुळे आमदार साहेब क्रोधित झाले आणि मग अर्थाअर्थी त्यांच्याकडून मारहाण झाली. या ठिकाणी आम्ही पुन्हा सांगतो आहोत की मारहाण करणे अजिबात बरोबर नाही. पण लाथांचे भूत बातांना मानतच नाही आणि नुसत्या बाता करून हे भूत उतरतही नाही. त्या भूताला लाथांचा प्रसाद दिल्याशिवाय त्या भुताची भूताई संपणार नाही, असे सरळसोट असलेल्या गायकवाड यांना वाटले असेल तर मग अन्यायासाठी आवाज उठवणे हे त्यांचे कर्तव्यच होते. त्यांचे मुद्दे कोणीही खोडलेले नाहीत याचा अर्थ जो कुणी कंत्राटदार आहे तो १००% दोषी आहे. आमदार साहेबांना पाच ते दहा टक्के दोष देणे योग्य आहे. पण असा प्रसंग का आला, याचा विचार आता महाराष्ट्राच्या अन्न आणि आहार विषयक सर्वाधिकार असलेल्या आहार नियंत्रण समितीने केलाच पाहिजे. आहार नियंत्रण समिती या कॅन्टीनमध्ये विहार करण्यासाठी नाही तर येथे येणाऱ्या ग्राहकांच्या रसनेला बहारदार जेवण आणि त्यासोबतच त्याची गुणवत्ता कशी टिकेल, हे पाहण्यासाठीच आहे. याचाच अर्थ कंत्राटदारा प्रमाणेच आहार समितीचे प्रमुखही दोषी आहेतच. या भोजनगृहाची कहाणी जुनीच आहे. फक्त जुन्या पानावरून पुन्हा नव्या पानावर लिहिण्यात आलेली आहे. इतकेच!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर

### लोकशाही व्यवस्था उलथून टाकणाऱ्यांवर कारवाई : जनतेचे अधिकार अबाधित राहणार : मुख्यमंत्र्यांची सभागृहात ग्वाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :
पुर्वी नक्षलवाद, माओवाद हा जंगलांपुरता सिमित होता. मात्र नंतर त्याची पाळेमुळे शहरांमध्येही पसरायला लागली. राज्यघटना, संसद अमान्य करत लोकशाहीवादी व्यवस्थाच उलथून टाकण्याचा यांचा प्रयत्न आहे. अशा विचारसरणीच्या संघटनांना प्रचलित कायदयानुसार प्रतिबंध घालणे अडचणीचे ठरत होते म्हणून हा विशेष जनसुरक्षा कायदा आणण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले.

विधानसभेत संयुक्त समितीने सादर केलेले विधानसभा विधेयक क्रमांक ३३ महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक बहुमताने मंजूर करण्यात आले त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

ते पुढे म्हणाले, या कायद्यानुसार कोणा एका व्यक्तीला अटक करण्याचे प्रावधान नाही. जर संघटनेवर बंदी आली आणि तो जर तिचा सदस्य असेल तरच अटक होईल, असेही फडणवीस म्हणाले.

आता हे विधेयक मंजुरीसाठी विधानपरिषदेकडे पाठविण्यात येईल. या विधेयकावर जनतेकडून १२ हजार सूचना आल्या होत्या. त्यांचे वर्गीकरण करून हा अहवाल सादर करण्यात आल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आधीच्या काळात देशात नक्षल, माओवादी विचारांनी प्रेरित होउन हातात बंदुका घेउन अनेक राज्यांत नक्षलवाद सुरू झाला. मात्र केंद्र, राज्य सरकारांच्या विशेष प्रयत्नांमुळे तो आता संपुष्टात यायला लागला आहे.



### माओवाद संपुष्टात येणार

महाराष्ट्रात पूर्वी चार जिल्हे नक्षलग्रस्त होते. आता हा माओवाद फक्त दोन तालुक्यांपुरता सिमित आहे. पुढच्या वर्षभरात तो देखील राहणार नसल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आंध्रसह इतर चार राज्यांनी अशा संघटनांवर बंदी आणण्यास सुरुवात केली. पण महाराष्ट्रात अशा संघटना सर्वाधिक म्हणजे ६४ आहेत. महाराष्ट्र त्यांच्यासाठी एकप्रकारे सेफ हेवन बनला आहे. महाराष्ट्रात त्याची पाळेमुळे घट्ट करण्याचा यांचा प्रयत्न आहे, म्हणून हा कायदा तयार करायला घेतला आहे.

### सर्वसामान्यांच्या विरोधात हा कायदा नाही

पत्रकार, राजकीय नेते, शिक्षक शेतकरी मोर्चा, डाव्या विद्यार्थी संघटनांचे आंदोलन तसेच कोणत्याही सर्वसामान्य नागरिकाच्या विरोधात हा कायदा नाही. त्यांचे लोकशाहीपदधतीने आंदोलन करण्याचे सर्व अधिकार अबाधित आहेत. अशा एखाद्या आंदोलनात जर हिंसाचार झालाच तर त्यासाठी भारतीय न्याय संहिता आहे. हा कायदा व्यक्ती नाही तर संघटनेच्या विरोधात आहे. ज्या संघटनांना राज्यघटना, संसद, लोकशाही व्यवस्था मान्य नाही ती ज्यांना उलथून टाकायची आहे, ज्यासाठी हिंसाचार घडवायचा आहे अशांना पायबंद घालण्यासाठी हा कायदा आहे.

कुठलेही आंदोलन करण्याचा अधिकार, सरकार विरोधात बोलण्याच्या अधिकारावर यामुळे गदा येणार नाही. पण जे संघटितरित्या राज्यघटनेने स्थापित व्यवस्थेला नाकारत आहेत त्यांच्यावर बंदी आणायला हा कायदा. या कायदयाच्या कोणताही गैरवापर होणार नाही हे मी या सभागृहाला आश्वस्त करतो असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## 'गद्दार' वरून खडाजंगी!

### आमदाराने डिवचल्याने मंत्री भडकले



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
राज्य विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात अर्थात विधान परिषदेत आज मराठी माणसाच्या मुद्यावर अनिल परब - शंभूराज देसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. अनिल परब यांनी मंत्री शंभूराज देसाई यांचा उल्लेख गद्दार म्हणून केला. त्यावर देसाई यांचा तोल ढळला.

गद्दार कुणाला म्हणतो रे, बाहेर ये तुला सांगतो, तुज्या आयला, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. यामुळे सभागृहात प्रचंड गदारोळ झाला. परिणामी, उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी स्थगित केले.

विधान परिषदेत आज मुंबईतील मराठी माणसांचा मुद्दा उपस्थित झाला. या चर्चेत हस्तक्षेप करताना अनिल परब यांनी मराठी माणसांना विविध प्रकल्पांत ४० टक्के घर प्राधान्याने देण्यासंबंधी कायदा करण्याची मागणी केली.
त्यावर मंत्री शंभूराज देसाई यांनी आपली भूमिका स्पष्ट करीत २०१९ ते २०२२ या काळातील सरकारमध्ये अशा पद्धतीचा कायदा तुम्ही केला होता का? असे प्रश्न यापूर्वी काही सदस्यांनी विचारल्याचे सांगितले.

शंभूराज देसाई यांच्या या विधानावर अनिल परब यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सदस्यांनी जोरदार आक्षेप घेतला. या गोंधळातच मंत्री देसाई पुढे म्हणाले, तुम्ही केले नाही. हे रेकॉर्डवर येत आहे, हे तुम्हाला ऐकवत नाही का? अरे तुम्ही केले नाही, तुम्ही करू शकला नाही याचा अर्थ तुमचे मराठीचे प्रेम हे पुतणा मावशीचे आहे. अध्यक्षा महोदया याला एवढे झोंबायचे काय कारण आहे? कशासाठी? तुम्ही स्वीकारा तुम्ही काहीच केले नाही. तुम्ही ऑन रेकॉर्ड स्वीकारा की तुमचे मराठी माणसांबद्दलचे प्रेम किती खरे आहे आणि किती वरवरचे आहे.

याचवेळी अनिल परब यांनी शंभूराज देसाई यांचा उल्लेख गद्दार असा केला. त्यावर देसाई चांगलेच भडकले. काय गद्दारी सांगतो. कुणाला म्हणतो गद्दार. बाहेर ये तुला दाखवतो. आयला. गद्दार कुणाला म्हणतो रे, असे ते म्हणाले. त्यानंतर गोंधळ वाढत असल्याचे पाहून उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी लगेचच सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी स्थगित केले.

## शिंदे अचानक दिल्लीला!

### मोठ्या नेत्यांना भेटल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :
एकनाथ शिंदे यांनी अचानक दिल्ली दौरा केल्याची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौऱ्यामध्ये भाजपच्या अनेक मोठ्या नेत्यांची भेट घेतल्याची माहितीही आहे. राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, निधी वाटप, तसेच महायुतीतील अंतर्गत कुरबुरी या मुद्यांवर चर्चा झाली असावी, अशी राजकीय वतुर्ळात शक्यता वर्तवली जात आहे..

दरम्यान एकनाथ शिंदे यांनी सुनील प्रभुची भेट घेतल्यानंतर दिल्ली गाठल्याची माहिती आहे. पावसाळी अधिवेशन सुरू असताना शिंदेंच्या दिल्ली दौऱ्याचे नेमके कारण काय? असा सवाल अनेकांना पडला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची गुप्त भेट घेतल्याचे वृत्त आहे. या भेटीबाबत कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

एकनाथ शिंदेंच्या या अचानक दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. शिंदे यांच्या या भेटींचे नेमके कारण अद्याप गुलदस्त्यातच असून, त्यामुळे अनेक तर्कवितर्कांना आणि चर्चांना उधाण आले आहे. शिंदे यांच्या अनुपस्थितीत नियोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी मंत्री उदय सामंत आणि अन्य नेत्यांना पाठवले, अशी माहितीही समोर आली आहे. गेली काही दिवस एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना नाराज असल्याचे बोलले जाते.

## आणीबाणी काळा अध्याय



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :
काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी एका लेखात लिहिले आहे की, आणीबाणी केवळ भारतीय इतिहासातील एक काळा अध्याय म्हणून लक्षात ठेवू नये, तर त्यातून धडा घेणे महत्त्वाचे आहे. त्यांनी नसबंदी मोहिमेला मनमानी आणि क्रूर निर्णय म्हटले.

थरूर यांनी लिहिले की, शिस्त आणि सुव्यवस्थेसाठी उचललेली पावले कधीकधी अशा क्रूरतेत बदलतात, ज्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येत नाही. ५० वर्षांपूर्वी २५ जून १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. तो एक काळा अध्याय होता.

## मराठी भाषेनंतर आता शेतकऱ्यांसाठी राज ठाकरे मैदानात

### बच्चू कडू यांच्या ७/१२ कोरा यात्रेला पाठिंबा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :
महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा बोलावीच लागेल. महाराष्टात राहून मराठी भाषेचा अपमान कोणी केला तर सहन केले जाणार नाही. अशा शब्दात राज ठाकरे यांनी मराठी भाषेचा एल्गार पुन्हा एकदा केला होता. आता शेतक?यांच्या प्रश्नावर देखील महाराष्ट्र नवनिर्माण सेना मैदानात उतरली आहे. यासंदर्भात प्रहार पक्षाचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू यांच्या ७/१२ कोरा आंदोलनाला मनसेने पाठिंबा दिला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळा नांदगावकर यांनी दारव्हा तालुक्यातील लाखखिंड येथे सातबारा कोरा यात्रेला भेट दिली. यावेळी त्यांनी बच्चू कडू यांची भेट



घेऊन या यात्रेस पाठिंबा जाहीर केला आहे. यासंबंधी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने आपल्या सोशल मीडिया अकाउंट वरून एक पोस्ट देखील करण्यात आली आहे.

सत्तेत आल्यावर विसर पडलेल्या सरकारला पुन्हा जागे करण्यासाठी काढण्यात ऐक्याला ७/१२ कोरा यात्रा? यात्रेस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पाठिंबा देण्यासाठी मनसे नेते श्री बाळा नांदगावकर यांनी बच्चू कडू यांची लाखखिंड ता. दारव्हा येथे आंदोलनकर्त्यांची भेट घेतली.'

## आमदार निवासातील कॅन्टीनचा परवाना रद्द

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
मुंबईतील आकाशवाणी आमदार अतिथीगृहातील कॅन्टीनचा परवाना अन्नाच्या दर्जामुळे अन्न विभागाने रद्द केला आहे.

अन्न आणि औषध प्रशासन (एफडीए) अधिकाऱ्यांनी कॅन्टीन मधून पनीर, चटणी, तेल आणि मसूर डाळींचे यांचे नमुने घेतले आहेत.

अधिकाऱ्याने सांगितले की, हे प्रयोगशाळेत पाठवले जातील आणि १४ दिवसांत अहवाल येईल. तोपर्यंत कॅन्टीनचा परवाना रद्द करण्यात आला आहे. शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या तक्रारीवरून अन्न व औषधी विभागाने ही कारवाई केली आहे.

## गुजरात पूल दुर्घटना मृतांचा आकडा १५ वर

### महिसागर पूल कोसळल्याने ५ वाहने खाली पडली

### ४ जण अजूनही बेपत्ता



■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. १० :
गुजरातमधील वडोदरा आणि आणंदला जोडणारा पूल कोसळल्यानंतर महिसागर नदीतून १५ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. एनडीआरएफला गुरुवारी सकाळी २ मृतदेह सापडले, तर बुधवारीच १३ मृतदेह बाहेर काढण्यात आले.

या अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. चार जण अजूनही बेपत्ता असल्याचे वृत्त आहे. त्यांचा शोध सुरू आहे.

बुधवारी महिसागर नदीवरील पूल कोसळला. वाहतूक सुरू असताना पूल कोसळल्याने दोन ट्रक, दोन कार आणि एक रिक्षा नदीत पडली. तुटलेल्या टोकाला एक टँकर अडकला.

४५ वर्षे जुना हा पूल दक्षिण गुजरातला सौराष्ट्राशी जोडत असे. तो कोसळल्यामुळे भरूच, सुरत, नवसारी, तापी आणि वलसाड येथून सौराष्ट्राला पोहोचणे कठीण झाले आहे. आता यासाठी अहमदाबादमधून जावे लागेल.

गंभीरा पूल १९८१-८२ मध्ये उत्तर प्रदेश राज्य पूल महामंडळाने बांधला होता. माहितीनुसार, २०१५ मध्येही गंभीरा पूल जीर्ण अवस्थेत आढळला होता. त्यावेळी सरकारने त्याची तपासणी केली आणि बेअरिंग्ज बदलावे लागले. पुलाच्या बांधकामात चांगले साहित्य वापरले नसल्याने ही परिस्थिती उद्भवली होती.

अपघातानंतर स्थानिक लोक घटनास्थळी पोहोचले आणि लोकांना वाचवले. एका स्थानिक तरुणाने सांगितले की, 'आम्ही सकाळपासून बचाव कार्य सुरू केले आहे. आतापर्यंत १५ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.

## येमेनमध्ये भारतीय नर्सवर फाशीची केस

### १६ जुलै रोजी शिक्षा



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १० :
येमेनमध्ये मृत्युदंडाची शिक्षा झालेली केरळची परिचारिका निमिषा प्रियाच्या खटल्याची सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सहमती दर्शवली.

केंद्र सरकारला राजनैतिक कारवाई करण्याचे निर्देश देण्याची याचिकेत मागणी आहे. न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांचे खंडपीठ आता १४ जुलै रोजी या खटल्याची सुनावणी करणार आहे.

येमेनी नागरिकाच्या हत्येप्रकरणी निमिशाला १६ जुलै रोजी फाशी देण्यात येणार आहे.

## मतदार यादी सुधारणा सुरूच राहणार

■ वृत्तसंस्था, पटना, दि. १० :
बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार यादीच्या पुनरीक्षणाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला.

सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला आधार, मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड हे ओळखपत्र म्हणून विचारात घेण्यास सांगितले. आता पुढील सुनावणी २८ जुलै रोजी होणार आहे.

न्यायालयाने विशेष सघन पुनरीक्षण म्हणजेच मतदार यादी पुनरीक्षणावर सुमारे ३ तास सुनावणी केली. याचिकाकर्त्यांचा आरोप आहे की मतदार यादी पुनरीक्षण नियमांना डावलून केले जात आहे. मतदाराचे नागरिकत्व तपासले जात आहे. हे कायद्याविरुद्ध आहे. सर्वोच्च न्यायालयाने विचारले की नाव मतदार यादीत समाविष्ट केले तर ही एक मोठी परीक्षा असेल.

## सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न तर नव्हे ना?

### नाना पटोले यांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
या सरकारमध्ये काय चालले आहे हे आपण पाहिले असेल. यामुळे सरकारची बदनामी झाली. संजय गायकवाड यांनी कर्मचाऱ्याला केलेली मारहाण ही देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करण्यासाठी होती का असा प्रश्न निर्माण होत आहे, असे काँग्रेस नेते नाना पटोले यांनी म्हटले आहे.

पटोले पुढे बोलताना म्हणाले की, राज्यात सत्तापक्षाच्या माध्यमातून जो गुंडाराज सुरू झाला आहे तो अशोभनीय आहे. कायदा हातात घेण्याची परंपरा या सरकारने सुरू केली आहे.आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीन च्या कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीबद्दल पटोलेंनी सरकारवर निशाणा साधला आहे.

### काँग्रेसची देखील स्वबळाची तयारी

पटोले यांनी काँग्रेसची देखील स्वबळाची तयारी असल्याचे म्हटले आहे. या आधी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील तसेच वक्तव्य केले होते.
पटोले यांनी संजय राऊत यांच्या वक्तव्यावर मला बोलण्याची आवश्यकता नसल्याचे म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक संदर्भात सर्वच पक्ष स्वबळावर तयारी करत असतात. तशी काँग्रेस पक्षाची देखील तयारी असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे.

## ठाकरे महाराष्ट्राच्या बाहेरून आले...

### शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरांचा अजब दावा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई,दि.१० :
शंकराचार्य स्वामी अविमुकतेश्वरानंद यांनी राज ठाकरे यांच्या मराठी भाषेच्या भूमिकेवर टीका केली आहे.

गुरु पौर्णिमेच्या निमित्ताने जगद्गुरु शंकराचार्य स्वामी अविमुकतेश्वरानंद यांचे दर्शन घेण्यासाठी भाविक येत असतात. एका वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी राज ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. मराठीला कानशिलात लगावणारी भाषा बनवल्याने यश मिळेल का? हिंदी ही राजभाषा आहे, त्याचा प्रोटोकॉल बनतो. ठाकरे हे देखील महाराष्ट्राच्या बाहेरून आले होते, ठाकरे मगधमधून आले होते, त्यांनाही मराठी येत नव्हती. महाराष्ट्राने त्यांना स्वीकारले आणि आज तेच मराठीसाठी भांडत आहेत, असा दावा त्यांनी केला आहे.

अविमुकतेश्वरानंद म्हणाले, राज ठाकरेंच्या बद्दल बोलायचे तर, याचा अर्थ देशातील कायदा व्यवस्था समाप्त झाली आहे. कोणी सार्वजनिक ठिकाणी उभे राहून मारहाण करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करत आहे, म्हणजेच कॉन्स्परन्सी आहे की, लॉ अँड ऑर्डर धोक्यात आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मला मराठी शिकवावी, मी दोन महीने मुंबईत असणार आहे, असे स्वामी अविमुकतेश्वरानंद म्हणाले.

# सातबारा कोरा यात्रेचा चौथा दिवस

**बच्चू कडूंच्या पायाला जखमा, तरीही प्रवास सुरूच | शेतकऱ्यांच्या वेदनांपुढे स्वत:चा त्रास क्षुल्लक - बच्चु कडू**





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.10 )**- शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली 'सातबारा कोरा' पायदळ यात्रा आज चौथ्या दिवशी अधिक खडतर अवस्थेत दाखल झाली. संततधार पावसात आणि दगळ, धोंड्याच्या रस्त्यांवरून चालताना कडू यांच्या पायाला खोल जखमा झाल्या आहेत. तरीही त्यांनी विश्रांती न घेता पुन्हा मार्गक्रमण सुरू ठेवत संघर्षाची ज्योत प्रज्वलित ठेवली.

या यात्रेत शेतकरी पारंपरिक बैलबंडींसह सहभागी झाले असून, वाटेत गावोगावी उत्स्फूर्त स्वागत केले जात आहे. लाखखिंड येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते बाळा नांदगावकर देखील यात्रेत सहभागी झाले. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जबाजारीपणा आणि सातबाऱ्यावरील थकीत नोंदी यांसारखे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. सरकारकडून कोणतीही ठोस पावले न उचलल्यामुळे शेती संकट अधिक तीव्र होत चालले आहे.

यात्रेदरम्यान बच्चू कडू आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट देत असून, प्रत्येक भेटीत हृदयद्रावक कहाण्या समोर येत आहेत. अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या डोळ्यांतून अश्रू न थांबता ओघळत आहेत. मात्र राज्य सरकार अजूनही मौन बाळगत असल्याने कार्यकर्त्यांत संतापाची भावना आहे. ही उदासीनता नसून निर्ढावलेपणाचे लक्षण असल्याची तीव्र टीका देखील यावेळी करण्यात आली. या पायदळ यात्रेच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी येत असून, सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आता जनतेतूनही होत आहे.

> मातीत चालणाऱ्या शेतकऱ्याचं दु:ख माझ्या पायांच्या जखमांपेक्षा खोल आहे. हा लढा केवळ पायदळ प्रवास नाही, तर राज्य सरकारच्या बेपर्वाई विरोधातील एक एल्गार आहे. सातबारा कोरा न झाल्यास संघर्षाचा वणवा उफाळून येईल,
>
> **बच्चू कडू, संस्थापक, प्रहार जनशक्ती पक्ष.**

# तळवेल-जवळा रस्त्याची दयनिय अवस्था

**वाहतूक ठप्प, शाळकरी मुलांचे हाल**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.10 )** - चांदूर बाजार तालुक्यातील तळवेल ते जवळा जिल्हा परिषद शाळेच्या पूर्वेकडील रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत बिकट बनली असून, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे या रस्त्यावर गुडघ्याएवढा गारा आणि चिखल साचला आहे. संपूर्ण मार्ग चिखलमय झाल्याने वाहतुकीसाठी पूर्णत: अयोग्य बनला आहे.


या रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी तर दूरच, पायदळ चालणेही कठीण झाले आहे. परिणामी गावातील दळणवळण पूर्णपणे ठप्प झाले असून, नागरिकांना दैनंदिन गरजांपूरतेही बाहेर पडणे जिकिरीचे झाले आहे. विशेषत: जवळील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरत आहे. चिखलातून शाळेत पोहोचणे हे त्यांच्या दृष्टीने रोजचे एक आव्हान बनले आहे.

रस्त्यावर अनेक ठिकाणी पाय घसरून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही ठिकाणी नागरिक प्रत्यक्ष चिखलात घसरून पडल्याच्या घटना नुकत्याच घडल्या आहेत, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या मार्गाविषयी ग्रामस्थांनी अनेकदा स्थानिक प्रशासनाकडे तक्रारी केल्या, निवेदने दिली, परंतु अद्याप कुठलाही ठोस उपाय योजलेला नाही. रस्ता दुरुस्तीच्या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

पावसाळ्यात तरी तात्पुरत्या उपाययोजनांद्वारे रस्ता गिट्टी व मुरूम टाकून चालण्यायोग्य करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे. स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन दुरुस्तीचे काम सुरू करावे, अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल, असा इशाराही काही युवकांनी दिला आहे.

# मंदिरमार्ग ठरतोय चिखलमार्ग

**नगरपंचायतीने डोळेझाक केल्यामुळे नागरिकांचे हाल**



**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली,( दि.10 )**- भातकुली नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे प्रभाग क्रमांक 2 मधील नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. बस स्टँड ते कोलठेक रोडदरम्यानचा रस्ता, विशेषत: श्री गजानन महाराज मंदिर परिसर, अत्यंत खराब स्थितीत असून पावसाळ्यात चिखलाचे साम्राज्य निर्माण होते.

या रस्त्यावरून दररोज नागरिकांची मोठी वर्दळ असूनही, खडीकरण वा मुरूम टाकण्याचे कोणतेही काम अद्याप नगरपंचायतीने हाती घेतलेले नाही. परिणामी, महिला, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढत मंदिर परिसरात प्रवेश करावा लागतो. विशेष म्हणजे मंदिरापासून पुढे अखेरच्या टोकापर्यंतचा रस्ताही तितकाच खराब अवस्थेत आहे.

प्रभागातील इक्बाल यांचे घर ते मुख्य रस्त्यापर्यंतचा मार्गही अद्याप अपूर्ण आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नगरपंचायतीने रहिवासी नसलेल्या काही लेआऊट भागात मात्र रस्ते व नाल्यांचे काम जलद गतीने पूर्ण केले आहे, जे अधिकच अन्यायकारक आहे. यामुळे संतप्त नागरिकांनी नगरसेवक, नगराध्यक्ष, उपाध्यक्ष व बांधकाम सभापती यांच्यावर संताप व्यक्त करत विचारले की, या भागाकडे दुर्लक्ष कधी थांबणार? आमदार रवी राणा आणि जिल्ह्याचे पालकमंत्री या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देतील का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तत्काळ गिट्टी वा मुरूम टाकून तात्पुरती व्यवस्था करण्याची गरज असल्याची मागणी देखील नागरिकांनी केली आहे, जेणेकरून पावसाळ्यात होणारा त्रास काही अंशी कमी होईल.

## 'ई-आर 1' ऑनलाइन सादर करण्याचे आवाहन

**अमरावती-** जिल्ह्यातील सर्व खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांना आता रोजगार विषयक सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या असून, 'ई-आर 1' (ER-1) प्रपत्र ऑनलाइन सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मोर्शीतील क्यूआर कोड बनले शोभेचे स्टीकर

**लाखो रुपयांचा खर्च वाया, कचरा संकलनातील अनागोंदी कायम**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.10 )** - स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत मोर्शी शहरात कचरा संकलन अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक व्हावे म्हणून लाखो रुपये खर्चून सुरू करण्यात आलेल्या क्यूआर कोड प्रणालीचा फज्जा उडाल्याचे वास्तव समोर आले आहे. घरांच्या भिंतींवर लावलेले क्यूआर कोड सध्या निष्क्रिय अवस्थेत असून, कचरा संकलनाचा डिजिटल ट्रॅकिंग उद्देश अपयशी ठरला आहे.



आयसीटी प्रणालीअंतर्गत प्रत्येक घरातून ओला व सुका कचरा उचलल्यानंतर सफाई कर्मचाऱ्यांनी क्यूआर कोड स्कॅन करायचा होता. यामुळे प्रत्येक भागातील कचरा संकलनाची वेळ, वारंवारता आणि नियमिततेची माहिती थेट डिजिटल स्वरूपात मिळणार होती. मात्र प्रत्यक्षात बहुतांश कर्मचाऱ्यांकडून हे कोड स्कॅनही केले जात नाहीत. मोर्शीतील कचरा संकलनाची जबाबदारी मोजक्याच चार गाड्यांवर असल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पूर्वी दररोज सकाळी नियमित गाडी येत असताना, आता काही कॉलनींमध्ये दोन-तीन दिवसांनीच गाडी फिरकते. यामुळे घराघरांत कचरा साठत असून दुर्गंधी व अस्वच्छतेचा त्रास वाढला आहे.

### फक्त स्कॅन, कचरा नाही!

काही महिन्यांपूर्वी एका कंत्राटदाराचा कर्मचारी कचरा न उचलता केवळ क्यूआर कोड स्कॅन करून जात असल्याचे स्थानिकांनी उघड केले. यामुळे या प्रणालीचा मूळ उद्देशच हरवला. अनेक घरांवरील कोड अजूनही लागलेले असले तरी त्याकडे कोणीही लक्ष देत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

### नागरिकांची संतप्त मागणी


शहरातील नागरिकांचा स्पष्ट सवाल आहे की, लाखो रुपये खर्चून सुरू केलेली प्रणाली जर वापरातच नसेल, तर हा खर्च म्हणजे थेट जनतेच्या पैशांचा अपव्यय नाही का? संबंधित यंत्रणांनी याकडे गांभीर्याने लक्ष देत तात्काळ यंत्रणा पुन: कार्यान्वित करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## तरुणी छेडखाणी

**अमरावती** - चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीत 16 वर्षांची अल्पवयीन मुलगी आपल्या मैत्रिणीसोबत पायी घरी जात असताना विक्की भोकरे (वय 26, रा. बडनेरा) या युवकाने तिची छेडछाड केली.

# स्वच्छतेच्या नावाखाली अस्वच्छता मोहिम?

**नागरिक त्रस्त, प्रशासनावर गंभीर आरोप**



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.10 )** -शहरात स्वच्छतेसाठी दरमहा कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागांत घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिक त्रस्त झाले आहेत. नगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या हलगर्जी कारभारामुळे शहरातील आरोग्य व्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. विशेषत- आरोग्य अधिकारी यांच्या कार्यशैलीमुळे स्वच्छतेच्या नावाखाली घाण पसरवल्याचे आरोप नागरिक करत आहेत. नागरिक उपरोधाने म्हणतात, शहरात स्वच्छतेची ऐवजी घाण फैलाव मोहिमच राबवली जात आहे.

शहरातील नवीन बसस्थानक परिसरात एका खासगी व्यावसायिक संकुलाच्या बांधकामासाठी काही महिन्यांपूर्वी खोदण्यात आलेला मोठा खड्डा नागरिकांच्या डोकेदुखीचा विषय ठरत आहे. तक्रारीनंतर काम थांबले असले तरी खड्डा तसेच राहिला. पावसामुळे त्यात पाणी साचून डासांचे उत्पादन केंद्र तयार झाले.यासंदर्भात व्यापाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर प्रशासनाची 'कुंभकर्णी झोप' उडाली. आरोग्य अधिकारी वानखेडे यांनी खड्डा बुजवण्याचा आदेश दिला. मात्र, यानंतर घडलेली बाब धक्कादायक ठरली शहरातील डम्पिंग डेपोमध्ये साचलेला कचरा या खड्ड्यात टाकण्यात आला. त्यानंतर माती टाकून खड्डा बुजवण्याचे नाट्य सादर करण्यात आले.

### बिल फुगविण्याचा डाव

या कृतीमुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून मलेरिया, डेंग्यू, टायफॉईडसारख्या साथींचा धोका वाढला आहे. डासांचा उपद्रव प्रचंड वाढल्यामुळे नागरिक संतप्त आहेत. अनेकांनी प्रशासनावर आरोप केला आहे की, हा सारा प्रकार 'खड्डा बुजवण्याच्या नावाखाली बिल फुगवण्याचा सुनियोजित डाव' आहे.

# भारत बंदला शेतकरी संघटनेचा पाठींबा

## तहसिलदारांना निवेदन सादर




**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.10 )** - संयुक्त किसान सभा व केंद्रित कामगार संघटनांच्या 9 जुलै रोजीच्या राष्ट्रीय संप व ग्रामीण भारत बंद आंदोलनाला पाठिंबा देत तिवसा तालुक्यातील शेतकरी व विविध संघटनांच्या वतीने एकत्र येत तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन तहसीलदारांमार्फत पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आले.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात शेतकऱ्यांनी अनेक दीर्घकालीन व मूलभूत मागण्या मांडल्या. त्यामध्ये शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, बिनव्याजी व दुप्पट मर्यादेचे पीककर्ज देणे, शासकीय नियंत्रणाखाली पीक विमा कंपनी स्थापन करणे व 90 टक्के पर्यंत नुकसानभरपाई देणे, यांसारख्या प्रमुख मागण्या होत्या. शेतमालाला हमीभाव मिळण्यासाठी कायदा लागू करावा, 2013 चा भूसंपादन कायदा पूर्णत: अंमलात आणावा व शेतकऱ्यांच्या हिताला बाधा आणणारे सर्व आदेश रद्द करावेत, अशीही ठाम मागणी करण्यात आली. शिवाय, पीकखालील जमीन इतर वापरासाठी वापरण्यावर बंदी घालावी आणि संत्रा पीक नुकसानभरपाईपासून वगळलेल्या शेतकऱ्यांनाही योग्य भरपाई द्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले. निवेदन देताना शेतकरी नेते प्रकाश सोनोने, चंद्रकांत वडसकर, सलीम खाँ, राजाभाऊ बाभुळकर, मनोहर वाढोणकर, विजय डेहणकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि शेतकरी यावेळी उपस्थित होते.

### इतरही मागण्या

शेतकऱ्यांना मासिक 10,000 रु. पेन्शन द्यावी, शेतीसाहित्याचे दर उत्पादन खर्चाच्या आधारे निश्चित करावेत, बोगस बियाणे व कीटकनाशक उत्पादक कंपन्यांवर बंदी घालावी आणि स्मार्ट वीज मीटर लावण्याचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, या मागण्यांनाही प्राधान्य देण्यात आले.

# बांधकाम कामगारांचे आंदोलन यशस्वी

**लेखी हमीने 90 दिवसांचे प्रमाणपत्र मिळणार**




**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.10 )** - तालुक्यातील शेकडो बांधकाम कामगारांनी बुधवारी पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडून आपली दीर्घकालीन मागणी पूर्णत्वास नेली. सिटूच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाला यश मिळाले असून प्रशासनाने लेखी आश्वासन देत बांधकाम कामगारांना 90 दिवसांचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांमार्फत देण्यात येईल, असे स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत कामगारांना विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ग्रामपंचायतमार्फत प्रमाणित 90 दिवसांचे कामाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. ही मागणी सिटू संघटनेकडून गेल्या दीड वर्षांपासून सातत्याने केली जात होती. मात्र, गटविकास अधिकारी व ग्रामसेवक संघटनांकडून दुर्लक्ष झाल्यामुळे अखेर कामगारांनी देशव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन छेडले. या आंदोलनात सिटूचे जिल्हाध्यक्ष अंकुश वाघ, सचिव ओमप्रकाश वाघमारे, उपाध्यक्ष रोशन कांडलकर, संतोष निमकर, शफिक शहा, समीर शेख, अभिजीत भेलकर, प्रफुल निकाळजे, नारायण गोहत्रे, पुरुषोत्तम ढेवले, अतुल बद्रे, राजू पाटील, विजय कातोरे, शुद्धोधन ढोले, संजय गेडाम, सचिन भोजने, अनिल चोपकर, जयकुमार मनवर, सुभाष रंगारी आदींसह शेकडो कामगार उपस्थित होते.

### चर्चेअंती लेखी आश्वासन

सकाळी 11 वाजता सुरू झालेल्या आंदोलनात तिवसा तालुक्यातील अनेक गावांमधील बांधकाम कामगारांनी सहभाग घेतला. यावेळी पंचायत समिती तिवसाचे सहायक गटविकास अधिकारी अमझरे, विस्तार अधिकारी उलेमाले आणि ग्रामसेवक संघटनेचे तालुका अध्यक्ष सुनील मोंढे यांनी आंदोलकांशी चर्चा केली. चर्चेनंतर प्रशासनाने 'सर्व गावांतील बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र देण्यात येईल' अशी लेखी आश्वासन सिटूच्या पदाधिकाऱ्यांना दिली. पंचायत समितीने सिटूच्या मागणीला मान्यता देत सर्व पात्र कामगारांना 90 दिवसांचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांमार्फत देण्याची कबुली दिली, अशी माहिती संघटनेकडून देण्यात आली.

# दर्यापूर शहरात मोकाट जनावरांचा हैदोस

**वाहतुकीला धोका, अपघातांमध्ये वाढ**

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.10 )** -शहरातील मुख्य रस्त्यांवर मोकाट जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अरुंद रस्त्यांवर वाहनांची वाढती गर्दी आणि त्यात भर म्हणून मोकाट जनावरांचा त्रास, यामुळे वाहतूक व्यवस्थेची कोंडी झाली असून अपघातांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. महत्वाचे म्हणजे, ही समस्या नव्हे तर गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली आहे. मात्र नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे ती अधिकच तीव्र झाली आहे. रस्त्यावर मुक्तपणे फिरणाऱ्या जनावरांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. गाई, बैल, शेळ्या अशी विविध जनावरे बाजारपेठ, बस स्थानक परिसर, मुख्य रस्ते आदी ठिकाणी अडथळा ठरली आहेत. नगरपरिषद प्रशासन आणि जनावरांचे मालक दोघांचाही या प्रश्नाकडे अत्यंत हलगर्जीपणे पाहण्याचा प्रकार अनेकदा समोर आला आहे. जनावरांवर मालकी हक्क सांगणाऱ्यांनी त्यांची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, अशी मागणी नागरिक करत आहेत.



> नगरपरिषदेने त्वरित उपाययोजना करून जनावरांचे मालकांवर कारवाई करावी, अन्यथा अपघातांची संख्या अधिकच वाढणार आहे. वाहतुकीचा प्रश्न निकाली काढणं आता अत्यावश्यक झालं आहे.
>
> **अंकुश पाटील कावडकर, जिल्हाप्रमुख, युवासेना**

### युवासेनेचं निवेदन; उपाययोजनेची मागणी


युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी नगरपरिषद दर्यापूरला लेखी निवेदन सादर करत, मोकाट जनावरांमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. शहरातील नागरिकांनीही ही समस्या दूर करण्यासाठी ठोस उपाययोजना आणि जनावरांच्या मालकांवर दंडात्मक कारवाईची मागणी केली आहे. अन्यथा स्थानिक लोकांच्या संयमाचा अंत होण्याची शक्यता आहे, असा इशाराही दिला जात आहे.

महासागर
अमरावती
शुक्रवार, दि. 11 जुलै 2025


# पुलाखाली आढळलेल्या अनोळखी महिलेची हत्या!

**हात-पाय बांधलेले, गळा आवळल्याचे स्पष्ट | शिरजगाव कसबा परिसरातील खळबळजनक घटना**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )** - शिरजगाव ते ब्राह्मणवाडा थडी मार्गावर असलेल्या लहान पुलाखाली एका अनोळखी महिलेचा मृतदेह गुरुवारी दुपारी संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. ही थेट हत्या असल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.



दुपारी सुमारे 2.30 वाजता एका स्थानिक नागरिकाला रस्त्यालगत असलेल्या पुलाखाली ब्लँकेटमध्ये गुंडाळलेला मृतदेह दिसून आला. माहिती मिळताच शिरजगाव कसबा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. महिलेचे दोन्ही हात-पाय कपड्याने घट्ट बांधलेले होते व गळा आवळल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे.

मृत महिलेला पिवळी साडी व ब्लाऊज, हातात हिरवट-सोनेरी बांगड्या आणि पायात पैजण होत्या. एक चप्पलही आढळून आली आहे. वय अंदाजे 25 ते 30 वर्षे असून मृत्यू 4-5 दिवसांपूर्वी झाल्याचा संशय आहे. उजव्या हातावर 'ए.एम. दुर्गा' व 'अनिल' अशी टॅटू गोंदलेली असून ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, सहाय्यक अधीक्षक शुभम कुमार यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मृतदेह अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून, पोलिसांनी खुनाचा तपास सुरू केला आहे. माहिती असणाऱ्यांनी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## बालविवाहातून अल्पवयीन मुलगी गर्भवती

### पतीविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 10 )** - प्रेमाच्या जाळ्यात अडकवून मंदिरात अल्पवयीन मुलीशी लग्न केले. त्यानंतर तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याने ती 6 महिन्यांची गर्भवती राहिली. ही धक्कादायक घटना कुर्हा पोलिस ठाण्याच्या हद्दीत 9 जूलै रोजी उघडकीस आली. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून कुर्हा पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पीडितेने तक्रारीत म्हटले आहे की ती तिच्या मामाच्या लग्नासाठी गावी गेली होती. तिथे तिची 27 वर्षीय तरुणाशी भेट झाली. त्यानंतर प्रेमसंबंध प्रस्थापीत झाले होते. परंतू अल्पवयीन मुलीच्या कुटुंबाला हे कळताच, त्यांनी मुलीचे लग्न दुसऱ्या तरुणाशी लावण्याचा निर्णय घेतला. दरम्यान आरोपी तरुणाने मुलीला पळून नेले आणि 14 मे रोजी त्याने मुलीशी मंदिरात लग्न केले. त्यानंतर दोघेही कुर्हा हद्दीत पती-पत्नीसारखे राहू लागले. 13 जून रोजी पीडिता पोटात दुखू लागल्याने जिल्हा महिला रुग्णालयात आली. जिथे तिची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी ती 6 महिन्यांची गर्भवती असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी तिच्या पतीविरुद्ध पोक्सो आणि इतर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

### अंजनगाव सुर्जीतही एक घटना

अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याच्या हद्दीतही अशीच एक घटना घडली. ज्यामध्ये 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी 5 महिन्यांची गर्भवती राहिली. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून अंजनगाव पोलिसांनी तिच्या पतीविरुद्ध आणि तिचे लग्न लावणाऱ्या कुटुंबीयांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## नोकरी लावण्याचे अमिष दाखवून 8.50 लाखांची फसवणूक

### तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 10 )**- नोकरी लावून देतो, असे सांगत अंजनगाव सुरजी येथील 65 वर्षीय व्यक्तीकडून तब्बल 8 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तीन आरोपींविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिस सुत्रानुसार, उत्तम वामनराव ढोरे (वय 65, रा. गुलजारपुरा, अंजनगाव सुरजी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा शेजारी रवींद्र भगवान गुजर याने त्यांच्या मुलाला नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. सुरुवातीला 20 लाख रुपये लागतील, असे सांगितले; परंतु नंतर त्याने ही रक्कम 17 लाखांवर आणली. उत्तम ढोरे यांनी आपल्या मुलाच्या भविष्यासाठी ही रक्कम देण्याचे ठरवले आणि 22 ऑक्टोबर 2021 रोजी 5 लाख, त्यानंतर 3 लाख 50 हजार रुपये आरोपींना दिले.

मात्र दोन वर्षांनंतरही मुलाची नोकरी लागली नाही, व पैसेही परत मिळाले नाहीत. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर उत्तम ढोरे यांनी अखेर पोलीस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी रवींद्र गुजर (रा.गुलजारपुरा), प्रदीप बेदरकर (रा.दहीगाव रेचा), व गोपाल मनोहर नारे (रा.ताजनपुरा, अकोट, अकोला) या तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवून पोलीस तपास सुरू केला आहे.

## माजी जि.प.सदस्य सारंग खोडसकर यांचे आजपासून उपोषण

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.10 )**- अंबाडा जिल्हा परिषद मतदारसंघाचे माजी सदस्य सारंग खोडसकर हे अंबाडा गावातील दीर्घकालीन व विविध समस्या सोडवण्यासाठी 11 जुलै 2025 पासून अंबाडा बसस्थानकात उपोषणास बसत आहेत.

गावातील मुख्य रस्त्याचे तात्काळ डांबरीकरण, अखंडित पाणीपुरवठा, मुद्गलभारती महाराज पालखी मार्गाचे विकास, तांडा वस्तीतील बंजारी, धनगर, भोई समाजासाठी रस्ते व नाले, मुख्य रस्त्यावरून मास विक्री हटवणे, घरकुल यादीतील वगळलेल्या लाभार्थ्यांचा समावेश, लझाड समाजासाठी समाज मंदिरासाठी निधी, अपूर्ण आदिवासी सभागृहाचे काम पूर्ण करणे, वीज वितरण कंपनीचे कार्यालय स्थापन करणे, मुख्य रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसवणे, ग्रामविकास व आरोग्य अधिकारी यांना मुख्यालयात राहण्याची सक्ती अशा अनेक मागण्या या उपोषणात मांडल्या जातील. या उपोषणाला ग्रामस्थांचा मोठा पाठिंबा असून रमेश खातदेव, नसीर पटेल, रवी कोकरे, सतीश बेहरे, अमित केंडे, भूषण खोडसकर, देवेंद्र संभावित, रमेश मालपे, सुरज जयस्वाल, प्रमोद देऊळकर, बलदेव राठोड, संदीप धुर्वे, यश कोकरे, नंदू फाटे, गोविंद पवार, योगेश्वर लेवरकर यांनी समर्थन जाहीर केले आहे. प्रशासनाने याकडे तत्काळ लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

# माझा गुरु म्हणजे शेतकरी! - बच्चू कडू

**गुरुपौर्णिमेला बच्चू कडू यांचे भावूक गुरुवंदना**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 10 ) :** या जगाच्या पाठीवर सगळ्यांना अन्न देणारा, स्वत: उपाशी राहून इतरांना पोसणारा शेतकरीच माझा खरा देव आहे,आणि तोच माझा गुरु आहे, असे भावनिक उद्गार प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त आज तिवरी येथे काढले. सध्या महाराष्ट्रभर सुरू असलेल्या सातबारा कोरा कोरा पायदळ यात्रेचा चौथा दिवस असून आज तिवरी येथे बच्चू कडू यांची पदयात्रा पोहचली त्याठिकाणी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना बच्चू कडू यांनी ही भावनिक प्रतिक्रिया दिली.



यात्रेच्या दरम्यान हजारो शेतकरी, महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांच्या भेटी अशा घटनांनी वातावरण आधीच भारलेले असताना, गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्यांचा हा शेतकऱ्याला दिलेला सच्चा मान संपूर्ण यात्रेला एक आध्यात्मिक अर्थ देऊन गेला. बच्चू कडू म्हणाले, तो शेतात घाम गाळतो, म्हणून आपण शहरात टीव्ही बघतो; तो भुकेला झोपतो, आपण पोटभर खातो. असा माणूस देव नाही तर कोण? आणि जो इतक्या समर्पणाने जगासाठी झिजतो, त्याला गुरु मानणं ही माझ्यासाठी फक्त भावना नाही ङ्क ही माझी जबाबदारी आहे.

सातबारा कोरा कोरा ही यात्रा म्हणजे केवळ रस्त्यावर चालणं नाही, तर शेतकऱ्याच्या वेदनेला आणि संघर्षाला न्याय देण्याचा प्रयत्न आहे. ही यात्रा म्हणजे माझ्या गुरूच्या चरणी अर्पण केलेली गुरुदक्षिणा आहे, असंही ते म्हणाले. आजच्या दिवशी त्यांनी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांना भेट दिली. या भेटींनी आणि त्या नजरेत दिसणाऱ्या दु:खाने त्यांच्या डोळ्यांत पाणी आणले. एक विधवा शेतकरी महिला आपल्या पतीच्या आठवणी सांगत असताना बच्चू कडू यांचा हात तिच्या डोळ्यांवर गेला ङ्क तेवढ्या शांततेतून शब्दही निघाले, तुमच्या नवऱ्याची लढाई आता माझी झाली आहे. ही यात्रा तुमच्यासाठी आहे.

शेतकऱ्याला फक्त सवलती नव्हे, तर आत्मसन्मान हवा आहे. कर्जमाफी ही त्याच्या हक्काची आहे, ही कोणती योजना नव्हे. सरकारने केवळ घोषणांच्या पलिकडे जाऊन कृती केली पाहिजे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा शेतकऱ्याच्या न्यायासाठी चाललेली आहे शेतकरी वर्ग मोठ्या आशेने या आंदोलनाकडे बघत असून आता केवळ शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ऑनलाइन जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा

**अमरावती** - फ्रेजरपुरा पोलीस ठाणे क्षेत्रातील नारायण नगर येथे सुरू असलेल्या ऑनलाइन लॉटरी सेंटरमध्ये चालणाऱ्या जुगार अड्डयावर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी रोख रक्कम, जुगार साहित्य असे एकूण 1 लाख 49 हजार रुपयांचे साहित्य जप्त केले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन यांच्या तक्रारीवरून राहुल नानाजी डंबारे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### नकद व सोनं लंपास

**अमरावती** - राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील सामरा नगर, गल्लीनंबर 3 येथील प्रमोद काटोले यांच्या घरात भाडेकरू म्हणून राहणारे प्रफुल वाखोडे आपल्या कुटुंबासह चिखलदरा फिरायला गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि घरातून 30 हजार रुपये रोख रक्कम, दोन सोन्याच्या अंगठ्या व लॉकेट असा एकूण अंदाजे 50 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

## जामगाव-नागझिरी रस्त्याचे डांबरीकरण अपयशी

**निकृष्ट दर्जाच्या कामावर संतप्त नागरिकांचा रोष**

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड ( दि.10 )**- तालुक्यातील जामगाव-नागझिरी मार्गाचे नुकतेच डांबरीकरण करण्यात आले. मात्र, काम पूर्ण होताच रस्त्यावर जागोजागी मोठाले खड्डे पडले असून, या रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. डांबर उखडल्याने रस्त्यावर प्रवास करणे धोकादायक बनले आहे. विशेष म्हणजे, पावसाळा सुरू झाल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. डांबरच दिसेनासा झाला असून रस्ता पुन्हा मातीचा झाला आहे.



नागरिकांच्या मते, या रस्त्याच्या डांबरीकरणात निकृष्ट दर्जाचा साहित्य वापरले गेले असून, डांबरात ऑईल मिसळल्याची शक्यता वर्तवली जात आहे. इतक्या कमी कालावधीत रस्ता उखडणे म्हणजे सरकारी निधीचा अपव्यय असून, शासनाचे लाखो रुपये पाण्यात गेल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

या कामासाठी जबाबदार ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी, त्याचे लायसन्स रद्द करून त्याला ब्लॅकलिस्टमध्ये टाकावे, अशी मागणी जोर धरत आहे. विशेष म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांनी याप्रकरणी अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढत असून, ठेकेदार व अधिकाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या प्रकारावर तत्काळ कारवाई न झाल्यास जामगाव परिसरातील नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देत आहेत. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषींवर कार्यवाही करावी, अशी मागणी सर्व स्तरांमधून होत आहे.

# धामणगाव रेल्वेच्या दुर्दशेवरुन लोकप्रतिनिधी आक्रमक

**आजी-माजी आमदारांनी दिल्या प्रतिक्रीया**




**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.10 )**- तालुक्यातील जुना धामणगाव गावातील रस्त्यांची अतिशय दयनीय अवस्था असून, पावसाळा सुरू होताच मुख्य रस्ते जलतलावात रूपांतरित होतात. मोठमोठे खड्डे, त्यात साचलेले पाणी, शाळकरी मुलांचे हाल आणि आपत्कालीन सेवा अडथळ्यात येणे ही गंभीर परिस्थिती सध्या गाववासीयांना रोज तोंड द्यावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर



स्थानिक लोकप्रतिनिधी आक्रमक झाले असून, विरोधकांनी ग्रामपंचायतीच्या अकार्यक्षमतेवर तसेच विकास निधीच्या चुकीच्या वाटपावर सवाल उपस्थित केले आहेत.

तर सत्ताधाऱ्यांनी या मुद्द्यावर विधानसभेत आवाज उठवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. 21व्या शतकात देखील अशा स्थितीत जगावं लागत असेल, तर ती शासन आणि स्थानिक प्रशासनाची अपयशाची कबुलीच ठरते, असे म्हणत लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित केली आहे.




मी खासदार म्हणून जुना धामणगावसारख्या गावांच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांचे अपयश, निधीचा अकार्यक्षम वापर आणि सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे गावाची परिस्थिती अत्यंत दयनीय बनली आहे. पावसात रस्त्यावर साचलेले पाणी, विद्यार्थ्यांची गैरसोय, रुग्णसेवेतील अडथळे या समस्या 21व्या शतकाला शोभणाऱ्या नाहीत. केवळ श्रेयासाठी स्पर्धा न करता कृतीतून विकास घडवावा लागेल. मी संसदेत व केंद्र शासनाकडे या समस्यांकडे लक्ष वेधणार असून, या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे,

**अमर काळे, खासदार, वर्धा.**



मी जुना धामणगावसह संपूर्ण मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांसाठी नेहमी आवाज उठवला आहे. सत्ता कोणाचीही असो, मी प्रामाणिकपणे जनतेच्या अडचणी शासन-प्रशासनापर्यंत पोहोचवल्या. आजही मी प्रशासनाला जाब विचारत असताना, आमचे सध्याचे आमदार मात्र विधानसभेत माझ्यावर कारवाईची मागणी करत आहेत ङ्क ही लोकशाहीची शोकांतिका आहे. जुना धामणगावचा विकास थांबवणं हे त्यांच्या अपयशाचं लक्षण आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी नेहमीच गप्प राहण्याऐवजी जबाबदार धोरण स्वीकारलं आहे. निवडणुकीनंतर राजकीय भेद बाजूला ठेवून, जनतेसाठी काम करणे हेच माझं तत्व आहे.

**विरेंद्र जगताप, माजी आमदार**



जुना धामणगाव लगतचा कॉलनी परिसर विकासाच्या दृष्टीने दीर्घकाळ दुर्लक्षित राहिला आहे. ग्रामपंचायतीला मोठ्या प्रमाणात कर मिळत असूनही त्या तुलनेत विकासकामांचा अभाव स्पष्ट आहे. आम्ही निधी उपलब्ध करून दिला असून भविष्यात आणखी निधीची तयारी आहे. मात्र नियोजनबद्ध अंमलबजावणी हीच यशाची गुरुकिल्ली आहे. अपूर्ण ले-आउट्स व नगरपरिषद हद्दवाढ प्रस्तावाकडे दुर्लक्ष ही मोठी अडचण आहे. नागरिकांनी आता संघटित होऊन विकासासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. विकास हा पक्षनिहाय नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

**प्रताप अडसड, आमदार, धामणगाव मतदारसंघ**

# घरकुलचा चेक देण्यासाठी 10 हजारांची लाच मागितली

**ठेका अभियंता रंगेहाथ अटक; एसीबीची धारणी पंचायत समितीत कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, ( दि. 10 )** - रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुलाचा तिसरा हप्ता म्हणून 40 हजार रुपयांचा चेक देण्यासाठी लाभार्थ्याकडे 10 हजार रुपयांची लाच मागणाऱ्या ठेका अभियंत्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी रंगेहाथ अटक केली. पंकज रमेशराव निंघोट (वय 30) असे त्या अभियंत्याचे नाव असून, तो तिवसा तालुक्यातील शेंदोडा खुर्द येथील रहिवासी आहे. सध्या तो धारणीतील धनई नगर परिसरात सुरेश धुर्वे यांच्या घरी भाड्याने राहत होता आणि पंचायत समिती धारणी येथे ठेका तत्वावर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता म्हणून कार्यरत होता.



दुनी येथील घरकुल लाभार्थ्याने एसीबी येथे तक्रार दाखल केली होती की, अभियंता निंघोट याने रमाई आवास योजनेंतर्गत तिसऱ्या हप्त्याचा चेक (40 हजार रुपयेये) काढून देण्यासाठी 15 हजार रुपयांची लाच मागितली होती. परंतु, सध्या पावसाळ्यामुळे लाभार्थ्यांने 10 हजार रुपये देण्याचे मान्य केले होते, आणि उर्वरित 5 हजार रुपये चेक रोख झाल्यावर देण्याचे ठरले होते.

एसीबीकडून तक्रारीची पडताळणी झाल्यानंतर 10 जुलै रोजी दुपारी 3.45 ते 4.02 दरम्यान, पंचायत समिती धारणीच्या कार्यालयात सापळा रचण्यात आला. त्यावेळी अभियंत्याच्या टेबलवरच 10 हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्याला रंगेहाथ पकडले. या घटनेवेळी इतर कर्मचारीही उपस्थित होते, त्यामुळे काही वेळ कार्यालयात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. ही कारवाई एसीबी अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, आणि उप पोलीस अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोलीस निरीक्षक सुजाता बन्सोड, पीआय मेसरे, पीआय ज्ञानोबा फड, प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, आशीष जांभोळे, उपनिरीक्षक सतीश कीटुकले, आणि पोलीस हवालदार शेंडे आदींचा समावेश होता.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

भाजपचा एक छपरी खासदार निशिकांत दुबे, आम्हाला मराठी माणसाला मराठी धर्म, मराठी मातीसाठी कर्म समजून सांगतोय. आम्हाला उचलून आपटण्याची भाषा करतोय. अगोदर हिंदूधर्म व त्या धर्माप्रती तुझे कर्म समजून घेतले का? ज्याला मावशी व मावसबहिण यातील फरक समजत नाही, त्याच्यासमोर गीता वाचून काय उपयोग? कुठेतरी राजकारणात ठाकरे परिवारातील दुरावलेले दोन भाऊ एकत्र झाले अन एका भैय्याने मराठी माणसाची भाकर काढली. मराठी माणसाकडे उद्योग धंदे नाही, मराठी माणूस टॅक्स भरत नाही. मग आम्हीच म्हणतो, जर असे आहे तर कशाला येता आमच्या महाराष्ट्रात? आता त्याच भाषेत म्हणावेसे वाटते की, मराठी माणसाच्या नादाला लागू नका अन्यथा जे होईल त्या परिणामाला सामोरे जावे लागेल. तर दुसरीकडे 'अजूनही वेळ गेलेली नाही, मराठी माणसा जागा हो, मराठी भाषेचा धागा हो' हेच पून्हा पून्हा म्हणावेसे वाटते. खरं म्हटलं तर मराठी लोक हे अभिमानी लोक आहेत. ते त्यांच्यावर केलेले उपकार कधीही विसरत नाहीत. पण त्यांचा अपमान करणाऱ्या कोणालाही ते सोडत नाहीत. ते स्वतःच्या जीवाचीही पर्वा न करता संकटात दुसऱ्याला मदत करतात. त्यांच्यासोबत आश्रय घेणा?्या कोणालाही ते हानी पोहोचवत नाहीत. असं असतांना एक बिहारी गुंड मराठी माणसांना धमकी देतो अन् त्याच्याच पक्षातील लोकं शांत बसतात, हे कशाचे लक्षणं? त्यासाठी मराठी माणसं एकत्र आलेली मिराभाईंदरला अनेकांना आवडले नाही.आमच्याच महाराष्ट्रात, गुजराथ्यांनी दुकान बंद करुन कींवा व्यापाऱ्यांनी मोर्चा काढलेला चालतो. पण मराठी माणसांनी काढलेला मोर्चा चालत नाही. ही दडपशाही, हुकुमशाही, मनमानी नाही तर अजून काय आहे ? महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महाराष्ट्राविरोधात बोलणाऱ्या दुबेच्या वक्तव्याची वकीली करतांना पाहील्यावर कपाळावरच हात मारावा लागला. मानलं की ते वकील आहे, पण ही किती लज्जास्पद गोष्ट आहे.? मुख्यमंत्री म्हणजे राज्याचा प्रमुख नागरिक आणि आम्ही उद्या पुढील पिढीला काय सांगायचे ? महाराष्ट्रात असे एक मुख्यमंत्री होऊन गेले, ज्यांना मराठीचा कणभर पण स्वाभिमान आणि अभिमान नव्हता ? जे मराठी माणसांसाठी, मराठी भाषेसाठी भाष्य न करता स्वतःच्या खुर्ची साठी यूपी, बिहार, गुजरात, राजस्थान, झारखंड साठी शेवट पर्यंत मराठी माणसाच्या विरोधात उभे होते, असे सांगायचे ? मराठी माणसांचे योगदान काय आहे हे महाराष्ट्रात स्पष्ट करण्याची गरज नाही. महाराष्ट्र हा मराठी माणसांचाच आहे हे बोलण्याची धमक पाहिजे. म्हणजे भटाला दिली ओसरी भट हातपाय पसरी अशी स्थिती स्वार्थी राजकर्त्यांनी आपल्या महाराष्ट्राची करुन ठेवली आहे. दिल्ली पुढे कधीच हा महाराष्ट्र झुकला नाही. पण हे सरकार झुकत आहे. त्यामुळेच दुबेसारखे लोक एवढे बोलत आहेत, बोलण्याचे धाडस करत आहेत!



# भैय्या हातपाय पसरी!




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

महाराष्ट्रात मराठी बोलणार नाही. काय करायचे ते करा, अशी माजोरडी वक्तव्य करणाऱ्या लोकांना मारणाऱ्या मनसेच्या कार्यकर्त्यांची पहलगामच्या दहशतवाद्यांशी तुलना करणाऱ्या बोलघेवड्या आशिष शेलारांना बेताल बडबडणाऱ्या दुबेचा दहशतवाद दिसत नाही का? तो दादागिरी करत म्हणतोय, मराठी लोकांनी महाराष्ट्राच्या बाहेर या, तुम्हाला आपटून आपटून मारू.

अरे, काय चाललंय काय या देशात? राज्यकर्त्यांना जनाची नाही पण मनाची तरी जरा लाज वाटली पाहीजे. हा माजोरडा खासदार गुंड प्रवृत्तीचा माणूस समस्त मराठी माणसांचा अपमान करत आहेच, पण वर धमकीही देतोय. प्रांताप्रांतात भांडण लावणारे चिथावणीखोर भाष्य करून लोकांची माथी भडकवणाऱ्या याच्या गटारी वक्तव्यावर कायद्यानुसार गृहमंत्री फडणवीस कारवाई करण्याची हिम्मत दाखवतील काय? की फडणवीसांनासुद्धा ह्याने मराठी माणसाबद्दल जे लाजिरवाणी बोल काढले आहेत आणि धमक्या दिल्या आहेत ते मान्य आहे? सत्तेच्या मतलबी हव्यासापोटी आपल्याच भाऊबंदांची लाज वेशीवर टांगण्याएवढे हे राजकारण कुठले?

खरे तर पहिलीपासून हिंदीसक्ती विरोधात सुरु झालेली लढाई बघता बघता मराठी भाषिक विरुध्द हिंदी भाषिक अशी सोईस्कर सुरु करण्यात आली. मग इतक्या कमी वेळात तो शाळेपर्यंत मर्यादित असलेला प्रश्न हिंदी भाषिक राज्ये विरुध्द मराठी अर्थात महाराष्ट्र असा रंगवायला सुरवात कशी झाली? अनेक ठिकाणी मुजोरीची भाषा खुलेआम वापरली जात आहे.

धर्माचा कुठलाही विषय नसतांना नमाज, मुस्लिम वस्त्यांमधील लोकांवर मराठीची सक्ती करुन दाखवा असे आव्हान महाराष्ट्रातीलच एका पक्षातील मराठी नेतेच देवू लागलेत. यात आश्चर्य वगैरे काही नाही. त्यांचा उदात्त हेतू लक्षात घेतला पाहीजे. आतातर व्यक्तीगत आव्हाने प्रतिआव्हानांनी खालची पातळी गाठली आहे.

एकंदरीत पुढच्या काळात महाराष्ट्रात मोठ्याप्रमाणात विध्वंसक सुडाचे राजकारण खेळले जाणार हेच दिसते. आपला तो 'पहिली पासून हिंदी भाषेची सक्ती नको' हा सोप्पा विषय किती आता कीती दुर घेवून जाईल हे सांगता येणार नाही. खरं पाहीले तर यूपी, बिहार मध्ये नोकरी धंदे नसल्यामुळेच पोट भरण्यासाठी ते लोक महाराष्ट्रामध्ये येतात.

महाराष्ट्रातील लोकांना पोट भरण्यासाठी त्यांच्या राज्यात यायची गरजच नाही. जे महाराष्ट्र मधले मराठी लोक इतर राज्यात व्यवसाया निमित्त स्थाईक झाले आहेत, ते त्या त्या राज्याच्या भाषेत बोलत असल्याचे दिसून येते.

यांना पोट भरण्यासाठी महाराष्ट्रात यायचे आहे, पण इथली स्थानिक मराठी भाषा बोलायला लाज वाटते. मग हेच त्यांना तामिळनाडू, आंध्र या राज्यात करून दाखवता येईल का? म्हणजे महाराष्ट्र मध्ये येऊन नोकरी व्यवसाय करायचा आणि परत दादागिरी पण करायची, हा कुठला न्याय?

अयोध्यात जेव्हढी पण हॉटेल सुरू झाली आहेत, ती सर्व कुणाची आहेत? शरयू नदीच्या सर्व बोटिंगची कॉन्ट्रॅक्ट कुणाकडे आहेत? स्थानिक फक्तं रिक्षा चालवत असून हॉटेल मध्ये कप बशा विसळत बसले. सर्व पक्षातील नेते मंडळीना जर महाराष्ट्राचा स्वाभिमान असेल तर उभी करा संयुक्त महाराष्ट्रासारखी चळवळ. नका करू सत्तेचा हव्यास वआपसात भांडाभांडी. परक्याच सत्तेसाठी लालनचुंगन करू नका. छ. शिवाजी महाराजांचा वारसा आहे हे विसरून मराठी साठी एक झाले तरच टिकाल.

महाराष्ट्रात पोट भरायला भैय्ये येतात, पण ज्या मातीत खाता पिता त्याचीच कदर करत नाही? महाराष्ट्र राज्य भारतात सगळ्यात जास्त जीएसटी भरतो. यांच्या बेरोजगारांना महाराष्ट्र रोजगार देतो, याचे उपकार मानले पाहीजे.

चारीधाम यात्रा, तिर्थयात्रा करून महाराष्ट्रीयन लोक यांचे विविध व्यवसाय वाढवून देतात. याची ही परतफेड का? महाराष्ट्रीयन लोक टॅक्स भरत नाहीत का? येथील समृद्ध महाराष्ट्रावर जगता व नको ती गरळ ओकता?

मराठी माणूस हा केवळ टॅक्स भरत नाही, तर तो देश घडवतो. शिवाजी महाराजांचा वारसा, आंबेडकरांची संविधान लेखणी आणि स्वातंत्र्याच्या लढ्यातील हजारो मराठी हुतात्मे, हे सगळं विसरू नका. जेव्हा टाटा, बिर्ला, अंबानी उभे राहिले, त्यावेळी त्यांच्या उद्योगांमध्ये राबणारे हातही मराठीच होते.

आम्ही इथे 'भाकरी' नाही खात, आम्ही इथे 'इमारती' उभ्या करतो, 'संस्कृती' जपतो, आणि गरज पडली तर योग्य उत्तर ही देतो. एवढीच खुमखुमी आणि माज असेल तर येथून चालते व्हा आणि बिहार युपी सुधरवा.



तुम्ही टाटा, बिर्ला, अंबानींची भाकरी खात आहे, तेच टॅक्स भरतात, मराठी लोक कुठला टॅक्स भरतात? आमच्या पैशावर तुम्ही जगत आहात, तुमच्यात हिमंत असेल तर महाराष्ट्राच्या बाहेर या. युपी, बिहार, तामिळनाडू मध्ये या, तिथं तुम्हाला आपटून आपटून मारु.
**निशिकांत दुबे**
भाजप खासदार

आपली सत्तेतील नेतेमंडळी कोणत्या गुहेत जाऊन बसली आहेत?

मराठी अस्मिता, मराठी अस्तित्व, मराठी भाषेची निशिकांत दुबे या बदमाशाने उघडपणे बदनामी केली आहे आणि आव्हान दिले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार पूर्णपणे मौन व्रत पाळताना दिसतात.

भाजपाच्या निशिकांत दुबेने महाराष्ट्रातील मराठी जनतेला शिवीगाळ केली आहे, मराठी भाषेचा आणि मराठी अस्मितेचा अपमान केला आहे.

महाराष्ट्रातील नेते सत्य दफन करण्यात आणि खोटेपणावर बडबड करण्यात व्यस्त आहेत. राज्यातील सत्तेमधील बुद्धिमान, ज्ञानी आणि प्रौढ विचारवंत आता कुठे गेले आहेत? ते आता वृत्तवाहिन्यांवर येऊन आपली बुद्धिमत्ता का दाखवत नाहीत? भाजपाच्या निशिकांत दुबेने महाराष्ट्रातील मराठी जनतेचा घोर अपमान केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार मराठी भाषा आणि मराठी अस्मितेसाठी आक्रमक का होत नाहीत?

महाराष्ट्रात मराठी अस्तित्व, मराठी अभिमान आणि मराठी सन्मान दुखावण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे कटू सत्य विसरता येणार नाही. मराठी सन्मानाचा अपमान करण्याचा प्रयत्न होत असताना अनेक नेते मौन व्रत पाळत आहेत. आता महाराष्ट्रातील मराठी जनतेने विचार करण्याची आणि समजून घेण्याची गरज आहे.

## होय, मुंबई महाराष्ट्राने विकत घेतलीय

महाराष्ट्राने मुंबईसह स्वतंत्र राज्य म्हणून जन्माला येण्यापोटी गुजरातला चक्क कोट्यवधी रुपये मोजले आहेत, हे फारच कमीजणांच्या गावी असेल. महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्ये अस्तित्वात येणार ही काळ्या दगडावरची रेघ ठरल्यानंतर राज्यघटनेच्या सातव्या व आठव्या परिशिष्टात आवश्यक सुधारणा करण्यात आल्या. गुजरात राज्याची राजधानी विकसित करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या राज्याच्या कॅश बॅलन्स इन्व्हेस्टमेंट अकाऊंटमधून रक्कम देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले होते. महाराष्ट्राने गुजरातला ते दिल्याची नोंद 'द गॅझेट ऑफ इंडिया एक्स्ट्रा ऑर्डिनरी'मध्ये आहे. मुंबईवरील ताबा राखण्यासाठी त्यावेळी किंमत चुकवावी लागली आहे. एका परीने मुंबई विकत घेतलीय. भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी झालेल्या फाळणीत पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे लागले, त्यावरून आजही एक वर्ग सतत विखारलेला असतो. इथे तर स्वतंत्र भारतातीलच एका राज्याने दुसऱ्याला ही किंमत मोजली आहे. या मुंबईत कामगार, चाकरमानी, कारकून, कष्टकरी आणि निर्धन बुद्धिवादी इतकीच ओळख असलेल्या मराठी माणसाला कोणताच न्यूनगंड बाळगण्याची गरज नाही. मुंबईसह महाराष्ट्र अस्तित्वात आणण्यासाठी १०६ हुतात्म्यांचे रक्त तर आपण सांडले आहेच, पण रुपयेही मोजले आहेत. आज पुण्या मुंबईत रोजगार देणाऱ्या कंपन्याचे मराठी मालक हातावर मोजता येतील इतकेच असतील, नाहीतर मालक परप्रांतीय आहेत आणि त्यांच्या कंपन्यात लाखो मराठी माणसे काम करत आहेत. अदाणी, अंबानी, ओसवाल, मोतीलाल, बिर्ला, टाटा, महिंद्रा आणि अनेक कंपन्याचे मालक परप्रांतीय आहेत. अगोदरच गिरण्या बंद करून मराठी माणसाला देशोधडीला लावले आणि जे उरले आहेत त्यानां पण संकटात पाडले जाईल, अशी भिती वाटते.

---

# आषाढी पौर्णिमेचे ऐतिहासिक महत्व

पौर्णिमा म्हणजे प्रत्येक महिण्याच्या मध्यावर असणारा पंधरावा दिवस होय. या दिवशी सुर्य व चंद्र यांच्या प्रकाशचा लाभ सतत २४ तास पृथ्वीवरील सजीव प्राणीमात्रांना मिळतो. सूर्याचा प्रखर व स्वच्छ प्रकाश, चंद्राचा शीतल व आल्हाददायक प्रकाश यामुळे या दिवशी पृथ्वीवर उत्साही, आनंदी व उत्तेजनशील वातावरण असते. निसर्गाच्या सनिध्यात अशा पौर्णिमेच्या दिवशी जीवन कसे उबदार व शक्तिवर्धक वाटते.

आषाढी पौर्णिमेच्या पवित्र दिवसाला गर्भमंगळ दिन, महाभिनिष्क्रमण दिन, धम्मचक्र प्रवर्तन दिन व वषार्वास प्रारंभ दिन अशा अर्थपूर्ण विविध नावानी संबोधिले जाते. या आषाढ पौर्णिमेच्या दिवशी तथागत गौतम बुध्दाच्या जीवनकालक्रमात फार मोठया संस्मरणीय घटना घडल्या आहेत.

आषाढी एकादशीला बुध्दांनी धम्मचक्र गतिमान केले, म्हणून या दिवशी त्याकाळी लोक विहारात जाऊन प्रवचनाचा लाभ घेत होते. त्या प्रथेचे स्वरुप बदलले असते तरी आजही लोक आषाढी पौर्णिमेला वाऱ्या काढतात. वाऱ्या आणि पालख्यांचे बीज धम्मचक्र प्रवर्तन दिनातून निघाले आहे.

कपिलवस्तूची महाराणी महामाया मातेच्या उदरी गर्भधारणा झाल्याची जाणीव निश्चीत झाली म्हणून या पौर्णिमेच्या दिवसाला गर्भमंगळ संबोधिल्या जाते. त्यानंतर बरोबर एकोणतीस वर्षांनी राजपुत्र गौतम यांनी आपल्या सुखमय वैभवाचा, स्वतःच्या पत्नीपुत्राचा, माता-पित्याचा, धनसंपत्तीचा केवळ जगातील मानवाच्या दुःखमुक्तीचा मार्ग शोधण्यासाठी, सत्याचे संशोधन करण्याच्या उद्देशाने प्रभावित होऊन या आषाढी पौर्णिमेच्या दिवशी गृहत्याग केला.

म्हणून या पौर्णिमेला महाभिनिष्क्रमण दिन असे संबोधिले जाते. गृहत्याग केल्यानंतर अथक परिश्रमाने स्वदेहास क्लेश देऊन सतत सहा वर्षाच्या घोर तपश्चर्येनंतर बोधीसत्व सिध्दार्थास बुध्दत्व प्राप्त झाले ते प्रज्ञावंत महामानव झाले.

सम्यक संबोधी प्राप्त झाल्यानंतर ज्ञानप्राप्तीच्या आनंदाचा अनुभव घेत घेत त्यांनी सतत तब्बल सात आठवडे पायी प्रवास केला. प्रवास करीत असतांनाच या आषाढ पौर्णिमेच्या दिवशी सारनाथ येथे पंचवर्गीय ब्राम्हण भिक्खूंना (कौडिण्य, अश्वजित, महानाम, कश्यप, भद्रीक) त्यांनी आपण स्वतः अनुभवलेल्या सत्यशोधनाचा उपदेश कथन केला. त्यांनी कथन केलेल्या सत्यशोधन ऐकूण हे पाचही ब्राम्हण भिक्षू प्रभावित झाले. ती या आषाढ पौर्णिमेच्या दिवशी करिता या पौर्णिमेस धम्मचक्र प्रवर्तन दिन असे संबोधिले जाते.

याचप्रमाणे या आषाढ पौर्णिमेचे दुसरे एक महत्व मानले जाते, ते म्हणजे पंचवर्गीय भिक्खू संघासोबत तथागत गौतम बुध्दांनी सारनाथ येथील ऋषिपतन हरणाच्या बागेत वर्षावास प्रारंभ केला म्हणून या पौर्णिमेस वर्षावास प्रारंभ दिन म्हणूनही संबोधण्यात येते. बुध्दांनी आपल्या एकसष्ठ भिक्षूंचा संघ आषाढी पौर्णिमेला स्थापन केला. जगातील सर्वात पहिल्या भिक्खू संघाची स्थापना ज्या दिवशी झाली तो दिवस आषाढी पौर्णिमा होता.

वर्षावास म्हणजे नेमके काय? याचे स्पष्टीकरण करावयाचे झाल्यास वर्षावास म्हणजे आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंतच्या कालावधीस वषार्वास म्हणतात. या वर्षावासाच्या कालावधीत भिक्खूगण सामुदायिकरित्या ठरविलेल्या एकाच ठिकाणी वास्तव्य करतात. ही परंपरा तथागतांनीच सुरु केलेली आहे. त्यांनी ४५ वषार्वास भिक्खूसंघा समवेत वास्तव्य केलेले आहे आणि तीच परंपरा आजतागायत प्रत्येक विहारात सुरु असते, आहे.

ज्याठिकाणी त्यांचे वास्तव्य असते. त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या परिसरातील बौध्द उपासक-उपासिकांना भगवान बुध्दाच्या पवित्र धम्माच्या शिकवणूकीचा उपदेश आपल्या धम्मप्रवचनातून करतात. धम्म आचरणात कसा आणावं, धम्म शिकवणूकीचे काटेकोरपणे पालन आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये कसे अमलात आवावे की जेणेकरुन माणसाचे अज्ञान, अविद्या नाहीसे होऊन तो माणूस सुज्ञ सुसंस्कृत होईल.

या वर्षावासाच्या कालावधीत ते बुध्द-धम्म-संघ या त्रिरत्नांची उद्बोधक माहिती सांगितली जाते. त्याचप्रमाणे उपासक-उपासिकांना बुध्द पूजा-वंदना-सुत्तपठण याचे आपला जीवनाशी निगडित असलेले महत्व हे देखील आपला धम्मप्रवचनाद्वारे भिक्षू कथन करतात. त्यामुळ उपासक-उपासिकांची आत्मशुध्दी होते कारण उपसाही केला जातो.

वर्षावासाचा कालावधी संपल्यानंतर श्रध्दाभावनेने, निष्ठेने सामुदायिकरित्या हा महोत्सव साजरा केला जातो. अशा तऱ्हेने या वर्षावास सोहळयाचा समारोप केला जातो. त्यानंतर एकत्रित वास्तव्य करीत असलेले सर्व भिक्खूगण धम्म प्रचारार्थ-प्रसारार्थ वेगवेगळया दिशेने वेगवेगळया ठिकाणी जातात. अशा प्रकारे आषाढ पौर्णिमेचे जगात अनन्यसाधारण महत्व आहे. उपासक-उपासिकांमध्ये बंधुत्वाची, समतेची, मैत्रीची, करुणेची भावना निर्माण व्हावी हीच वर्षावासानिमीत्त मंगलकामना, शुभेच्छा !



प्रभाकर सोमकुवर
नागपूर
9595255952

---



## गोरक्षणाचे तथाकथित ठेकेदार

ओडिशाच्या गंजम जिल्ह्यातील सिंगीपूर गावात ५९ वर्षीय बाबुला नायक यांच्यासोबत जे घडले ते भयंकर आहे, त्यांच्या चेहऱ्यावर जखम आहे, पांढरी दाढी, गळ्यात टॉवेल आणि मुंडण केलेले डोके. दोन्ही गुडघे जखमांनी सुजलेले आहेत. ते प्लास्टिकच्या खुर्चीवर बसतात आणि घाबरून आजूबाजूला पाहतात. त्यांना हिंदी बोलता येत नाही, पण हिंदी समजते. ते म्हणतात की ते त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी एक गाय आणि दोन वासरे खरेदी करत होते, तेव्हा वाटेत काही लोकांनी त्यांना गोरक्षणाच्या नावाखाली थांबवले आणि ३० हजार रुपयांची मागणी करू लागले.

जेव्हा त्यांनी पैसे देण्यास नकार दिला तेव्हा त्यांनी त्यांना बेदम मारहाण केली. जेव्हा त्यांचा ४२ वर्षांचा भाऊ बुलू नायक त्यांना वाचवण्यासाठी आला तेव्हा त्यालाही बेदम मारहाण करण्यात आली. त्यानंतर, ते दोन्ही भावांना बाजारात घेऊन गेले. त्यांचे मुंडण केले आणि त्यांना बाजारात ओढत नेले.

त्यानंतर त्यांना दोन किलोमीटर गुडघ्यावर चालायला लावण्यात आले, ज्यामुळे दोन्ही भावांच्या गुडघ्यांना गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना गवत खायला भाग पाडण्यात आले आणि पिण्यासाठी नाल्याचे पाणी देण्यात आले. ही घटना २२ जून २०२५ रोजी गंजम जिल्ह्यातील खारीगुमा गावात घडली.

देशात ठिकठिकाणी असे गोरक्षणाच्या नावावर तथाकथित ठेकेदार निर्माण झाले असून, गोरगरीब पशुपालक आणि नागरिकांचा ते छळ करताहेत. याविषयी मात्र एकही नेता ब्र काढताना दिसत नाही.

---

# पंढरपूर : स्वच्छता, सुरक्षा, नीतीनियम विठुरायाच्या भरोशावर

पंढरपूर, देशाच्या आध्यात्मिक चेतनेचं केंद्रबिंदूझ लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेचा महामेरू आणि तरीही, संपूर्ण नियोजन व्यवस्थेचं चित्र मात्र विठुरायाच्या भरोशावर लटकलेलं दिसतंय. वारकरी समाजसेवक गजानन हरणे यांनी प्रशासनाच्या गाफीलपणावर थेट बोट ठेवलं असून, स्वच्छता, सुरक्षा आणि नियमावली यांचा संपूर्ण बट्ट्याबोळ झालाआहे.

**ढासळलेले नियोजन**

यात्रेच्या निमित्ताने लाखो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी रांगेत उभे असतात. पण त्या रांगेचा अनुभव काय? कुचंबलेले शेड्स, लांबवरच्या स्वच्छतागृहे, उघड्यावर लघवी करण्याची वेळ, बंद पडलेले पंखे, शेडच्या आत जाळी अनुचेदार रेती टाकलेली, त्यावर टाकलेले कापड जागोजागी फाटलेले जागोजागी खड्डे अशा अनेक समस्याने व उष्म्याने थकलेली मंडळी आणि त्यांच्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही, स्वच्छतेचे ढोंग उघडे पडलेले आहे. काही ठिकाणी तर कचराकुंड्या तकलादू अवस्थेत आहेत, तर काही ठिकाणी दिसतच नाहीत.

एवढ्या मोठ्या यात्रेसाठी जी महत्त्वाची असलेली यंत्रणा असते तीच गाफील, निष्क्रिय आणि अपयशी ठरली आहे. लाखो भक्त रांगेत उभे, पण त्यांना संरक्षण, सुविधा, स्वच्छता किंवा गरजेचा आधार देणारे कुठेच नाही.

शेडमध्ये उभे असलेले भाविक, पण नियोजन कुठे आहे? पाण्याची सोय नाही, प्रकाशाची व्यवस्था कोलमडलेली, सुरक्षारक्षक दिसत असले तरी जागी नसलेले, काही ठिकाणी तर कर्मचारी मोबाईलवर किंवा झोपेत, हे दृश्य एका आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या धर्मस्थळाला साजेसं वाटतं का?

अनेक भाविक, विशेषतः वृद्ध आणि वयस्कर महिला, दिव्यांग यांच्यासाठी वेगळी रांग लावणे आवश्यक असताना सुद्धा यांनाच तब्बल १० ते १२ तास या लाईनमध्ये उभे असतात.

पण या लाईनमधून घुसखोरी करणारे लोक पैसे देऊन पोलिसांच्या मदतीने आत प्रवेश करत असल्याचे चित्रही दिसते. यात भाविकांचा संयम तुटतो, वाद निर्माण होतात आणि यात्रेचा पवित्र माहोल कलुषित होतो.

गजानन हरणे
वारकरी समाजसेवक
खडकी, अकोला.
9822942623

**दर्शनासाठी संघष हे नवं वर्णन?**

स्वतःच्या गरजा भागवण्यासाठी भाविकांना लघवी उघड्यावर करावी लागते, कारण शौचालय इतक्या लांब आहेत की त्या अंतरानेच भक्तांचा संयम संपतो. काही ठिकाणी शेडच्या बाहेर लागून मुत्री घराची व्यवस्था न केल्यामुळे तेथील अस्वच्छता व दुर्गंधी भक्तांच्या त्रासात भर घालते.

**नगरपालिका, पोलीस, प्रशासन तीनही यंत्रणा निद्रिस्त**

विठुरायाच्या नावाने सेवा करणाऱ्या ठेकेदारांची कामगिरी ढिसाळ आहे. लाईनमध्ये वायरी अस्ताव्यस्त असून विजेच्या शॉकचा धोका आहे. सुरक्षेची जबाबदारी असलेले पोलिस केवळ गर्दीवर ओरडण्यात धन्यता मानतात. नगरपालिका एवढ्या मोठ्या क्षेत्रात कचरापेटी ठेवण्यास असमर्थ का? की ती हेतुपुरस्सर दुर्लक्षित केली जाते?

पंढरपूरसारख्या आस्था आणि आध्यात्मिकतेच्या ठिकाणी अशा प्रकारचं हलगर्जी नियोजन हे भाविकांच्या श्रद्धेचा अपमान आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन, यात्रेच्या अगोदर संपूर्ण व्यवस्था काटेकोरपणे उभी करावी.

**श्रद्धेचा महासागर, पण नियोजनाचा कोरडा दुष्काळ**

पंढरपूर यात्रेला महाराष्ट्रासह संपूर्ण देशातून आणि विदेशातूनही भक्त येतात. त्यांच्या सोयीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा, जसे की स्वच्छता, विश्रांतीगृहे, पाण्याची सोय, आरोग्य व्यवस्था, आपत्कालीन सेवांची उपलब्धता झ या साऱ्यांचा अभाव वारकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवाला येतो.

**प्रशासनाची जबाबदारी शून्य?**

पंढरपूर हे केवळ एक तीर्थक्षेत्र नाही, तर ते महाराष्ट्राच्या आत्म्याचा भाग आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या पदस्पर्शाने विठ्ठल मंदिराचा परिसर पवित्र होतो, पण त्या पवित्रतेला व्यवस्थेचा आधार लाभतोच असे नाही.

यात्रेचे नियोजन वारकऱ्यांच्या सेवेसाठी असावं, त्रासासाठी नाही. विठुरायाच्या भरोशावर ठेवलेलं नियोजन योग्य नाही, हे उत्तरदायित्व आता प्रशासनाने पेलावं. त्यांना ते जमत नसेल तर नियोजन आयोजन स्वच्छता या श्री संत गजानन महाराज शेगाव संस्थे जवळून शिकणे त्यांना गरजेचे आहे.

त्यांचा आदर्श त्यांनी घेऊन पंढरपूर येथे भक्तासाठी व्यवस्था करणे गरजेचे आहे. एवढी रास्ता अपेक्षा सर्व वारकरी यांची आहे ते पुढच्या पंढरपूर यात्रेच्या अगोदर पूर्ण करावे ही अपेक्षा.

---

## स्वातंत्र्योत्तर काळात सुराज्यासाठी पुन्हा एकदा संघटित व्हा!

**वाचक लिहितात**

देशात भाषावाद, प्रांतवाद, जातिवाद, धर्मद्वेषाने ग्रासलेल्या समाजाला देशातील सर्वच पक्षांचे नेते तसेच वामपंथी संघटनेचे नेते काय मार्गदर्शन करणार आहेत? मार्गदर्शन करण्यासाठी आधी स्वतः साधना करावी लागते. आध्यात्मिक दृष्टिने परिपक्व असलेल्या हिंदू संघटनांच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांनाच माध्यमांनी प्रसिद्धि द्यावी. शासन आणि प्रशासन यांमध्ये समाजानेच आध्यात्मिक नेत्यांना पुढे आणले पाहिजे, तरच दिशाहीन समाजाला योग्य मार्गदर्शन मिळेल.

स्वातंत्र्योत्तर काळात उद्भवलेल्या प्रश्नांची उत्तरे आसनस्थ सत्तेतील किंवा विरोधी सर्वपक्षीय नेत्यांकडे आहेत का? हजारो वर्षेच काय युगानुयुगांच्या प्रश्नांची उत्तरेही कोणी अज्ञानापोटी धर्माचा आंतरिक अभ्यास (आत्मज्ञान) नसल्यामुळे ते देऊ शकत नाही. हे सर्व नेते समाजाची फक्त दिशा भरकटवू शकतात! कितीही बुद्धिचे चातुर्य लावले तरीही हे नेते समाजाला योग्य दिशेवर आणू शकत नाहीत हेच सत्य आहे. सध्याच्या आसनस्थ पक्षीय नेत्यांनी स्वतःहून माघार घ्यावी.

भ्रष्टाचाराने कमावलेल्या पैशांच्या जोरावर आलीशान सभा घेणारे ह्या नेत्यांपेक्षा संघटनेच्या तुटपूंज्या परंतु मुल्यवान अर्पण-धनातून सभा घेणारे हिंदू संघटनांचे कार्यकर्ते उत्तम राज्य चालवू शकतील. हिंदू समाजानेच देशात रामराज्यासम उत्तम राष्ट्र-निर्मितीसाठी आध्यात्मिक क्रांति आणावी, यासाठी सर्वच राज्यातील हिंदू समाजाने एकत्र येऊन संघटित होणे ही काळाची गरज !

■ भूषण वाळुणसकर, डोंबिवली.

---

# आकाशातून वीज पडल्यानंतरच जमिनीच्या आत उगवते ही भाजी

## किंमत आणि फायदे जाणून थक्क व्हाल



पावसाळ्यात पालेभाज्या महाग होतात. भाज्यांच्या किंमती या प्रचंड वाढतात,पावसाळ्यात भाज्या खरेदी करताना कायम काळजी घ्यावी लागते. एक अशी भाजी आहे जी फक्त पावसाळ्यातच उगवतात आणि त्या भाज्यांना प्रचंड मागणी असते. मागणी प्रमाणे या भाज्यांच्या किंमती देखील वाढतात.

या खास प्रकारच्या भाजीची किंमत १००, २०० किंवा ३०० रुपये प्रति किलो नाही तर १००० ते १२०० रुपये प्रति किलो आहे. तरीही, लोक ती खरेदी करण्यासाठी वर्षभर वाट पाहतात. विविध जिल्ह्यांच्या बाजारपेठेत ही खास प्रकारची भाजी आली आहे. या भाजीला शाकाहारी मटण देखील म्हणतात.

विशेष म्हणजे ही भाजी शेतात उगवत नाही. या भाजीचे नाव आहे रुगडा. या भाजीची किंमत जास्त आहे त्यामुळे त्याची चर्चा नाही तर त्याच्या अद्भुत चवीमुळेही तिला मोठी मागणी आहे. ही भाजी केवळ जीवनसत्त्वे आणि प्रथिने समृद्ध नाही तर रक्तदाब आणि उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठीही रामबाण उपाय मानली जाते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते**

डॉक्टरांचा असाही विश्वास आहे की रुगडाच्या सेवनाने मानवी रोगप्रतिकारक शक्ती सुधारते. या भाजीमध्ये व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि कॉपर देखील आढळतात. त्यात कॅलरीज खूप कमी प्रमाणात असतात.

खरं तर, रुगडा ही मशरूम प्रजातीची भाजी मानली जाते, परंतु ती मशरूमसारखी जमिनीच्या वर वाढत नाही.

उलट, ती जमिनीच्या आत तयार होते, जी जून आणि जुलैमध्ये म्हणजेच फक्त २ महिन्यांत मुसळधार पाऊस आणि वीज पडल्याने सखुआच्या झाडाभोवतीची जमीनीच्या आत उगवते मग ती हळूहळू जमिनीच्या बाहेर येऊ लागते.

**भाजीची किंमत?**

गावकऱ्यांच्या मते, जितका जास्त पाऊस आणि वादळ असेल तितकेच सखुआच्या जंगलातून आणि सखुआच्या झाडाभोवतीच्या जमिनीतून रुगडा बाहेर पडते.

बरेच लोक या भाजीला भूमिगत मशरूम म्हणून देखील ओळखतात. रुगडाच्या १२ प्रजाती आहेत, त्यापैकी पांढरा रुगडा, सर्वात पौष्टिक मानला जातो.

झारखंडची समृद्ध अन्न संस्कृती जिवंत ठेवण्यात तसेच झारखंडच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात ही भाजी महत्त्वाची भूमिका बजावते.

या भाजीची किंमत कितीतरी पट अधिक असली तरी ज्यांना माहित आहे, ते घेतातच. त्यामुळे तुम्हाला देखील बाजारात ही भाजी कधी दिसली तर एकदा नक्कीच आरोग्यदायी भाजी ट्राय करा.

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### गुरु पोर्णिमा

ज्याईच्या पासुन मी
शिकलो कायी
माहा साष्टांग दंडवत
त्याहीच्या पायी.. !

माय बाप गुरुचा
ज्याला मिळे आर्शिवाद
जनम मरण्याच्या फेऱ्यातुन
मुक्त होई तो निर्विवाद ..

ज्याच्यावर असीन
सद्गुरूची छाया
भौ त्याले भ्रमीत
करू शकत नाई माया ..

सदगुरुंच्या उपदेशाचं
जो करे पालन
सफल होऊन जातं
त्यांचं मानवी जीवन .. !

# कोलकाता येथे खाणकाम, धातू आणि संबंधित उद्योगांचे ४ दिवसीय आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे आयोजन

■ नागपूर,दि. १० जुलै :

कोलकाता येथे ३० ऑक्टोबर २०२५ पासून आयोजित करण्यात येणाऱ्या खाणकाम, धातू आणि संबंधित उद्योगांच्या चार दिवसांच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन-सह-काँग्रेसमध्ये अर्जेंटिनामध्ये अलीकडेच अधिग्रहित केलेल्या पाच लिथियम ब्लॉक्समधून दुर्मिळ पृथ्वी खनिजे काढण्याच्या भारताच्या प्रयत्नांवर सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे.

भारताला खाणकाम आणि उत्पादनासाठी, विशेषतः महत्त्वाच्या खनिजे आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांमध्ये जागतिक केंद्र म्हणून स्थापित करण्यावर अधिक लक्ष केंद्रित करणे हे उद्दिष्ट आहे.

देशांतर्गत उत्पादन क्षमतांव्यतिरिक्त खाणकाम आणि धातू उद्योगाच्या वाढीला चालना देण्यासाठी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या उद्देशाने केलेले हे प्रदर्शन, कोल इंडियाचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक पीएम प्रसाद यांच्या या संदर्भात पूर्वीच्या प्रतिपादनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

दुर्मिळ पृथ्वी धातूंच्या निर्यातीवरील चीनच्या निर्बंधांना बाजूला सारण्यासाठी भारत सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमाशी हे पाऊल पूर्णपणे सुसंगत असले तरी, केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री माननीय श्री. जी. किशन रेड्डी यांची या कार्यक्रमात उपस्थिती, दुर्मिळ पृथ्वी खनिजांच्या पर्यायी स्रोतांच्या शोधात भारताच्या महत्त्व वाढवणारी शक्यता आहे.

जेडब्ल्यू मॅरियट, आयटीसी सोनार (स्टील कॉन्फरन्स आणि प्रदर्शन), बिस्व बांगला मेळा प्रांगण आणि सायन्स सिटी ग्राउंड येथे १.१ लाख चौरस मीटर जागेवर पसरलेल्या या प्रतिष्ठित द्वैवार्षिक प्रमुख कार्यक्रमात -आशियाई खाण काँग्रेस (एएमसी), आंतरराष्ट्रीय खाण प्रदर्शन (आयएमई), आंतरराष्ट्रीय स्टील आणि धातू विज्ञान प्रदर्शन (आयएसएमई) आणि आंतरराष्ट्रीय स्टील कॉन्फरन्स (आयएससी) यांचे प्रदर्शन केले जाणार आहे.

२०२५ मध्ये भारतातील स्टीलची मागणी ८ ते ९ % ने वाढण्याचा अंदाज आहे, जी देशांतर्गत स्टील उद्योगासाठी एक मजबूत मार्ग दर्शवते. श्री प्रसाद यांच्या मते, अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियामधून अनुक्रमे मिळवले जाणारे लिथियम आणि महत्त्वाचे खनिज ब्लॉक स्वच्छ ऊर्जेच्या उत्पादनात महत्त्वाची भूमिका बजावतील. वीज निर्मितीसाठी कोळशाची कमतरता भासणार नाही, असे ते म्हणाले, कारण २०२६ मध्ये देशांतर्गत कोळशाचे उत्पादन ९०० दशलक्ष टन इतके होणार आहे, जे सध्या ८७५ दशलक्ष टन आहे. म्हणूनच, खाणकाम, उपकरणे, खनिजे आणि धातू, नवीनतम तंत्रज्ञान आणि संशोधन आणि विकासाचे त्यांचे नाविन्यपूर्ण अनुप्रयोग आणि सर्वोत्तम पद्धतींचे प्रक्षेपण करण्यासाठी आयएमई आणि आयएसएमई २०२५ हे आदर्श व्यासपीठ आहेत.

एएमसीमध्ये जगभरातील सुमारे २५ देशांतील ६०० हून अधिक प्रतिनिधी एकत्र येतील, ज्यात धोरणकर्ते, उपकरणे उत्पादक, सराव करणारे अभियंते आणि तंत्रज्ञान सल्लागार तसेच शिक्षणतज्ज्ञांचा समावेश असेल. या काँग्रेस आणि प्रदर्शनात ६०० हून अधिक प्रदर्शक, १०० वक्ते, २५ देश सहभागी होण्याची अपेक्षा आहे. ऑस्ट्रेलिया, रशिया फेडरेशन, जर्मनी, चेक रिपब्लिक, पोलंड, चीन आणि इतर काही देशांचे देश मंडप उभारले जाण्याची शक्यता आहे, असे कार्यक्रमाचे आयोजक एमजीएमआय आणि टॅफकॉन यांच्या वतीने प्रवक्त्याने आज येथे सांगितले.

खनिजांनी समृद्ध भारतीय राज्ये, सार्वजनिक उपक्रम, कॉर्पोरेट्स, एसएमई आणि इनोव्हेटर्स/स्टार्ट-अप्स इत्यादींचा जोरदार सहभाग, या सूर्यप्रकाश क्षेत्रातील वैविध्यपूर्ण परिसंस्थेचे प्रतिबिंबित करून चार दिवसांच्या कार्यक्रमाला समृद्ध करेल.

वेगाने विकसित होत असलेल्या खाणकामाच्या क्षेत्रात, या खाणकाम, धातू आणि धातूशास्त्र कार्यक्रमांना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे कारण ते उद्योग नेत्यांना सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करण्यासाठी, प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आणि सहकार्यासाठी नवीन संधी शोधण्यासाठी एक मंच प्रदान करत आहेत.सहभागींना नेटवर्किंगसाठी जास्तीत जास्त संधी देण्यासाठी, नवीन संपर्कासाठी दरवाजे उघडण्यासाठी आणि थेट व्यावसायिक संवादांना चालना देण्यासाठी, खरेदीदार-विक्रेताबैठका, रबर कॉन्फरन्स, इनोव्हेटर्स सत्र आणि तंत्रज्ञान सत्रे यासारख्या प्रदर्शनांसह अनेक नेटवर्किंग कार्यक्रमांचे नियोजन केले आहे.

भारतातील आधुनिक आणि यांत्रिकीकृत खाणकाम उपायांच्या वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी आघाडीचे खाण उपकरणे आणि यंत्रसामग्री उत्पादक त्यांची नवीनतम स्पर्धात्मक उत्पादने प्रदर्शित करतील. या कार्यक्रमात अनेक देश आणि राज्य पातळीवरील प्रतिनिधी मंडळे आणि किमान २५००० अभ्यागत येण्याची अपेक्षा आहे. प्रदर्शन आणि कार्यक्रमांना कोळसा, खाण, पोलाद मंत्रालय, भारत सरकार, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (सीएसआयआर ) आणि कोल इंडिया लिमिटेड आणि ऑस्ट्रेड, व्हीडीएमए , रशियन फेडरेशन, , -इत्यादी संस्थांचे पाठबळ आहे.

# सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स आज सादर करणार आहे त्याचे सर्वात पातळ, हलके आणि टिकाऊ फोल्डेबल स्मार्टफोन

■ गुरुग्राम,दि. १० जुलै :

दक्षिण कोरियाची तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनी सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स आज ब्रुकलिन, न्यूयॉर्क येथे आपल्या नवीनतम फोल्डेबल स्मार्टफोनचे अनावरण करण्यासाठी सज्ज झाली आहे. भविष्यातील तंत्रज्ञान घडवणाऱ्या दूरदृष्टी आणि धाडसी कल्पनांसाठी ओळखली जाणारी सॅमसंग, आपल्या गॅलेक्सी पोर्टफोलिओतील नवीनतम आणि सर्वोत्तम उत्पादने अशा शहरात सादर करणार आहे, जेथे संस्कृती, सर्जनशीलता आणि सहकार्य यांचा संगम आहे. कंपनीने संकेत दिले आहेत की येणारे फोल्डेबल्स आता सातव्या पिढीत हे आतापर्यंतचे सर्वात पातळ, हलके आणि टिकाऊ असतील.

२०१९ मध्ये प्रथम सादर झालेल्या गॅलेक्सी फोल्डने ग्राहकांसाठी स्मार्टफोनच्या पोर्टेबिलिटीसह टॅब्लेटसारखी उत्पादकता देणाऱ्या फोल्डिंग स्मार्टफोनच्या नव्या श्रेणीची सुरुवात केली. मात्र, या श्रेणीला अजूनही मर्यादित प्रतिसाद मिळाला आहे, कारण किंमती जास्त आहेत आणि टिकाऊपणा व दीर्घायुष्याबाबत शंका आहेत.

या मुख्य मुद्द्यांवर सॅमसंग भर देणार असल्याची शक्यता आहे, जेव्हा कंपनीच्या डिव्हाइस एक्सपीरियन्स डिव्हिजनचे कार्यकारी प्रमुख टीएम रोह या आठवड्यात ब्रुकलिन कन्व्हेन्शन सेंटरमध्ये मंचावर येतील. कंपनीने अलीकडेच सांगितले आहे की, गॅलेक्सी मालिकेच्या प्रत्येक पिढीला अधिक पातळ, हलके आणि टिकाऊ बनवण्यासाठी त्यांच्या अभियंत्यांनी आणि डिझायनर्सनी सातत्याने सुधारणा केल्या आहेत.

सॅमसंगने कॅमेरा क्षेत्रातही नाविन्यपूर्ण बदलांचे संकेत दिले आहेत. नवीन फोल्डेबल डिव्हाइसेसमध्ये अधिक शक्तिशाली, डायनॅमिक आणि इमर्सिव कॅमेरा सिस्टम असणार आहे. सॅमसंगच्या अलीकडील टीझर्सनुसार, कंपनी गॅलेक्सी २५ मालिकेतील अल्ट्रा कॅमेरा अनुभव नवीन गॅलेक्सी फोल्ड ७ मध्ये आणण्याची शक्यता आहे. याचा अर्थ, गॅलेक्सी फोल्ड मालिकेला प्रथमच फ्लॅगशिप कॅमेरा मिळू शकतो, ज्यामुळे फोल्डेबल फोन घेण्याची इच्छा असणाऱ्या पण कॅमेरामुळे नाराज असलेल्या ग्राहकांची अडचण दूर होईल.

सॅमसंग आपल्या गॅलेक्सी एआयसह अधिक एआय फीचर्स आणण्याची रणनीतीही सुरू ठेवण्याची शक्यता आहे. कंपनीच्या मते, एआय केवळ डिव्हाइसेस काय करू शकतात यापेक्षा पुढे आहे, तर लोक त्यांच्याशी कसे संवाद साधतात हे महत्त्वाचे आहे. कंपनीकडून ब्रेकथ्रू हार्डवेअरने समर्थित नवीन एआय-पावर्ड इंटरफेस सुद्धा सादर केला जाण्याची अपेक्षा आहे.

# ऑफस्क्रीन मस्ती! सरूच्या कलाकारांसोबत शगुन पांडे आणि मोहक मटकर यांनी खेळला खो खो!

■ मुंबई,दि. ०९ जुलै :

झी टीव्हीवरील नवीन मालिका सरू आपल्या गावाकडच्या पार्श्वभूमीवरील भावस्पर्शी कथा, दमदार अभिनय आणि वास्तवदर्शी मांडणीमुळे प्रेक्षकांच्या मनात घर करत आहे. परंपरा, कौटुंबिक नाती आणि वैयक्तिक विकास यांचे सुंदर मिश्रण या मालिकेत पाहायला मिळते. आणि येत्या भागात प्रेक्षकांसाठी एक मजेशीर ट्विस्ट असणार आहे जेव्हा वेद (शगुन पांडे) आणि सरू (मोहक मटकर) खो-खोखेळताना दिसतील. हा प्रसंग कथानकात ऊर्जा तर निर्माण करेलच, पण कलाकार आणि टीमसाठी तो बालपणीच्या आठवणीही जागवणारा ठरणार आहे.

या प्रसंगाचे चित्रीकरण सुरू असताना, लोकप्रिय अभिनेता शगुन आणि मोहक या खेळामध्ये इतके रंगून गेले की सुट्टीच्या वेळेतही त्यांनी खेळ चालू ठेवायचा ठरवले. जो एक ठरवलेला सीन म्हणून सुरू झाला होता, त्याचे आता एका सामन्यामध्ये रूपांतर झाले, कारण कलाकार आणि क्रूतील इतर सदस्यही त्यात सामील झाले. सेट एका मिनी प्लेग्राउंडमध्ये बदलला सगळे अगदी शाळेत असताना जसं करत असत तसे हसत, धावत आणि एकमेकांना प्रोत्साहन देत होते. त्यामुळे वातावरण अगदी बदलून गेले आणि सर्वांच्या लाहानपणीच्या आठवणी जाग्या झाल्या.

# महिंद्रातर्फे एक्सयुवी ३एक्सओ आरईवीएक्स सीरीज लाँच, किंमत ८.९४ लाख रुपयांपासून सुरू

## खास वैशिष्ट्ये, अनोखी स्टाइल आणि दर्जेदार कामगिरी




■ मुंबई,दि. १० जुलै :

महिंद्रा अँड महिंद्रा लि. या भारतातील आघाडीच्या एसयूव्ही उत्पादक कंपनीने आज नवीन एक्सयुवी ३एक्सओ आरईवीएक्स सीरीज ८.९४ लाख रुपयांच्या आकर्षक किंमतीत लाँच आहे.

एक्सयुवी ३एक्सओनेनुकताच एका वर्षाच्या आत १ लाख विक्रीचा टप्पा पार केला असून ती महिंद्राची हा टप्पा सर्वाधिक वेगाने पार करणारी एसयूव्ही ठरली आहे. आरईवीएक्स सीरीजमध्ये एक्सयुवी ३एक्सओ पोर्टफोलिओ आणखी विस्तारला जाणार आहे. त्यातून ग्राहकांच्या प्रीमियम वैशिष्ट्ये, अनोखे स्टायलिंग आणि सर्वोत्तम कामगिरी अशा सर्व महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

आपल्या अनोख्या व्यक्तिमत्त्वाचे झलक दर्शवणारी वाहने पसंत करणाऱ्यांसाठी आरईवीएक्स सीरीज वैयक्तिक अभिव्यक्तीचं प्रतीक आहे, कारण ही गाडी डिफरंट इज इन असे म्हणण्याची हिंमत असणाऱ्यांसाठी आहे.

आरईवीएक्स सीरीजमधील सर्व तीन व्हेरिएंट्स पाच आकर्षक रंगांत उपलब्ध आहेत गॅलेक्सी ग्रे, टँगो रेड, नेब्युला ब्लू, एव्हरेस्ट व्हाइट आणि स्टेल्थ ब्लॅक.

# आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्सने वर्ध्यामध्ये विमा आणि आर्थिक साक्षरता मोहिमेचे केले आयोजन

■ वर्धा,दि. १० जुलै :

विविध आर्थिक सेवा पुरवणारी, भारतातील आघाडीची कंपनी, आदित्य बिर्ला कॅपिटलची जीवन विमा उपकंपनी, आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने वर्ध्यामध्ये विमा आणि आर्थिक जागरूकता उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. जीवन विम्याचे महत्त्व, संपूर्ण कुटुंबाचे आर्थिक भवितव्य सुरक्षित करण्यात त्याची भूमिका याविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे.

इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ इंडियाने आखून दिलेल्या महाराष्ट्र राज्य विमा जागरूकता योजनेंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यामध्ये आदित्य बिर्ला सन लाईफ इन्शुरन्सला महाराष्ट्र राज्यासाठी आघाडीची जीवन विमा कंपनी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. गेले अनेक आठवडे एबीएसएलआयने वर्धा जिल्ह्यातील विविध ग्राम पंचायतींमध्ये जागरूकता शिबिरे आयोजित केली आहेत. नेरी आणि बोरगाव इत्यादी गावांचा त्यामध्ये समावेश आहे. ही सर्व शिबिरे उपस्थितांसाठी माहितीपूर्ण आणि समजायला अतिशय सोपी असावीत यासाठी एबीएसएलआयने खेळाच्या माध्यमातून शिक्षण देणारे एक साधन साप-शिडीचाखेळ तयार केला आहे. हा खेळ गावकऱ्यांना विम्याच्या सर्व संकल्पना अगदी सोप्या पद्धतीने आणि खेळीमेळीने समजून घेण्यात मदत करतो.

स्थानिक विद्यार्थी, शिक्षक आणि गावातील इतर अनेक लोक या शिबिरांमध्ये अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते. वर्गांमध्ये माहिती देणारे तक्ते लावून सजावट करण्यात आली होती, एबीएसएलआयच्या प्रतिनिधींनी अतिशय सोप्या पद्धतीने विमा संकल्पना समजावून सांगितल्या.

# बंधन म्युच्युअल फंडचा बंधन मल्टी-फॅक्टरफंड लाँच




■ नागपूर,दि. १० जुलै :

बंधन म्युच्युअल फंडने आपली नवीन ओपन-एंडेडइक्विटी योजना बंधन मल्टी-फॅक्टरफंड सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही योजना एक प्रगत आणि विकसित मल्टी-फॅक्टर क्वांटिटेटिव्ह मॉडेल आधारित गुंतवणूक संकल्पना वापरते. या फंडामध्ये चार वेळेवर पडताळलेले गुंतवणूक घटक गती, मूल्य, गुणवत्ता आणि कमी अस्थिरता एकत्रित करून गुंतवणूकदारांना विविधरूप पोर्टफोलिओ उपलब्ध करून दिला जातो.

या योजनेचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) गुरुवार, १० जुलै २०२५ रोजी उघडेल आणि गुरुवार, २४ जुलै २०२५ रोजी बंद होईल.

या नव्या योजनेबाबत बोलताना बंधन एएमसीचे सीईओ विशाल कपूर म्हणाले, 'जसजसा बाजार अधिक गतिमान आणि प्रभावी होत चालला आहे, तसतशी गुंतवणूकदारांना अशा रणनीतींची गरज आहे, जी बाजार चक्रांशी सुसंगत राहून टिकाव धरू शकतील. मल्टी-फॅक्टरगुंतवणूक ही एक प्रभावी इक्विटी गुंतवणूक रणनीती म्हणून पुढे आली आहे, विशेषतः अशा परिस्थितीत जिथे कोणताही एक घटक सर्वच वेळी आघाडीवर राहू शकत नाही. तेजीच्या बाजारात गती, पुनरुत्थानाच्या टप्प्यात मूल्य, मंदीच्या काळात गुणवत्ता आणि अनिश्चिततेत कमी अस्थिरता चांगले काम करते. बंधन मल्टी-फॅक्टर फंडाचा उद्देश केवळ एका घटकावर अवलंबून राहणे टाळणे आणि एकंदर जोखीम समायोजित परतावा वाढवणे आहे.'

या फंडाचे पोर्टफोलिओ देशातील प्रमुख २५० मोठ्या आणि मिड-कॅप कंपन्यांच्या युनिव्हर्समधून तयार करण्यात आले आहे. प्रत्येक स्टॉकला वर दिलेल्या चार घटकांच्या आधारे गुण दिले जातात, त्यानंतर प्रभावी फॅक्टर कॉम्बिनेशन्स निवडले जातात.

# जुवेनाईल इडिओपॅथिक आर्थरायटिस (जेआयए) समजून घ्या: लवकर निदान आणि उपचारांसाठी पालकांसाठी मार्गदर्शिका

■ नागपूर,दि. १० जुलै :

जुवेनाइल इडिओपॅथिक आर्थरायटिस (जेआयए) हा १६ वर्षांखालील मुलांमध्ये होणारा एक गंभीर आणि दीर्घकालीन ऑटोइम्यून आजार आहे ज्यामध्ये सांध्यांमध्ये सूज येते. हा फक्त शारीरिक वाढीमुळे होणारी दुखणी नसून एक गंभीर आजार आहे जो मुलांच्या शारीरिक वाढीवर, विकासावर आणि संपूर्ण जीवनमानावर परिणाम करू शकतो.



वोक्हार्ट हॉस्पिटल नागपूर येथे बालरोगतज्ज्ञ सल्लागार म्हणून काम करत असताना, मला अनेकदा असे पालक भेटतात जे मुलांच्या सांधेदुखीला फारसं गंभीर समजत नाहीत. पण खरंतर मुलांच्या सांधेदुखीमागे एखादा ऑटोइम्यून आजार असू शकतो. या आजाराची सुरुवातीची लक्षणे लवकर ओळखल्यासवेळीच उपचार करून मुलाचे आयुष्य बदलू शकते.

# शालिनीताई मेघे हॉस्पिटलच्या शस्त्रक्रिया कौशल्याने जटिल स्तन कर्करोगावर यशस्वी उपचार

■ चंद्रपूर,दि. १० जुलै :

बल्लारपूर येथील महिलेला यशस्वी मास्टेक्टॉमी शस्त्रक्रियेनंतर शालिनीताई मेघे हॉस्पिटल मध्ये नवजीवन मिळाले

गेल्या तीन वर्षांत वानाडोंगरी, नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर या हॉस्पिटलने ४५० बेडपासून सुरूवात करून १०२० बेडचे मल्टी-सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून उल्लेखनीय प्रगती केली आहे. मध्य भारतातील गरजू लोकांसाठी परवडणारी व दर्जेदार आरोग्यसेवा पुरवणारे हे हॉस्पिटल आता आशेचा किरण ठरले आहे. सर्वांना सहानुभूतीपूर्वक आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा देण्याच्या उद्देशाने शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून आपली सेवा सतत वाढवत आहे.

अलिकडेच, बल्लारपूर येथील एका ३८ वर्षीय महिलेला शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ. राजीव सोनारकर यांच्या देखरेखीखाली नागपूरच्या वानाडोंगरी येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. या रुग्णाच्या डाव्या स्तनात गेल्या दोन वर्षांपासून गाठ होती, जी हळूहळू वाढत होती. सुरुवातीला तिने सुमारे एक वर्ष होमिओपॅथिक उपचार घेतले, परंतु त्याचा कोणताही विशेष फायदा झाला नाही.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल मध्ये दाखल झाल्यानंतर तिच्या डाव्या स्तनात खरूज आलेली आणि फुगलेली गाठ दिसून आली. ताबडतोब तपासणीसाठी आवश्यक चाचण्या सुरू करण्यात आल्या, ज्यामध्ये एमआरआय, सीटी स्कॅन आणि ट्रुकट बायोप्सीचा समावेश होता. बायोप्सीच्या रिपोर्ट मध्ये स्तनाच्या कर्करोगाची पुष्टी झाली. विविध वैद्यकीय तज्ज्ञांच्या सल्लयानंतर, शस्त्रक्रिया विभागाने आधी कर्करोगावर औषधोपचार (निओएडजुवंट उपचार) करून मग शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून रुग्णावर सर्वोत्तम उपचार करता येतील.

## राशी भविष्य

मेष : आजचा दिवस संमिश्र असेल. कामाच्या ठिकाणी विचार न करता कोणालाही काहीही बोलू नका, अन्यथा तुम्ही संकटात पडू शकता.

वृषभ : आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज जर तुम्ही भागीदारीत कोणतेही काम करत असाल तर त्याचा तुम्हाला फायदा होईल.

मिथुन : आज नोकरी करणाजया लोकांना काळजीपूर्वक काम करावे लागेल आज तुम्हाला आर्थिक बाबींमध्ये देखील सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे

कर्क : तुम्हाला तुमच्या लपलेल्या शत्रूंपासून सावध राहावे लागेल, अन्यथा ते तुमचे काम खराब करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू शकतात.

सिंह : या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अनुकूल आहे. एखाद्या मित्राचा पाठिंबा मिळेल.

कन्या : आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या पाठिंब्याचा आणि सल्ल्याचा फायदा होऊ शकतो. गुंतवणूक करण्यापूर्वी सर्व पैलू समजून घ्यावे लागतील.

तुळ : आजचा दिवस चांगला जाईल. आज तुमच्या प्रयत्नांमध्ये नशीब तुम्हाला साथ देईल. तुम्ही वाहन चालवण्याचा आनंद घेऊ शकता.

वृश्चिक : आज तुम्हाला तुमच्या जोडीदाराचा पाठिंबा मिळेल. एखादी मोठी इच्छा पूर्ण होईल. नात्यात सुसंवाद राखण्याचा प्रयत्न करा.

धनु : जर तुम्हाला मालमत्तेत गुंतवणूक करायची असेल तर आज त्याच्यासाठीही चांगला दिवस असेल.

मकर : आज तुम्हाला व्यवहाराच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. जे लोक पाणी आणि पाण्याशी संबंधित व्यवसाय करतात, त्यांच्या उत्पन्नातही वाढ होईल.

कुंभ : नोकरदार लोकांना प्रसिद्धी आणि सन्मान मिळेल. तुम्ही तुमच्या कुटुंबासमवेत आनंदाने वेळ घालवाल.

मीन : विद्यार्थ्यांसाठी दिवस अनुकूल असेल. तुमची लपलेली प्रतिभा समोर येऊ शकते, जी पाहून लोकांना आश्चर्य वाटेल.


## आज का अंदाज

शुक्रवार ११ जुलै २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| १३८ | १५९ | १२३ | २३४ | १६६ | २६६ | १४० | १३४ |
| ३४५ | २६७ | २५९ | ४५० | ५९९ | ७७० | २५८ | ३५० |
| ६७९ | ७८० | ४५७ | ३६० | ३०० | १४९ | ६९० | २८८ |
| २४ | ५४ | ६१ | ९१ | ३० | ४० | ५१ | ८१ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३२ | ४२ | ५७ | ८७ |
| २० | ५० | ६४ | ९३ | ३६ | ४६ | ५९ | ८९ |


११ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७३ |
| ०५ | १५ | ४९ | ७६ |
| ०८ | १८ | ४३ | ७९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## शब्दकोडे क्रमांक २१६१



आडवे शब्द :-
१) विशेष उल्लेखनीय हकीगत
६) चीजवस्तू
११) मस्ती, जोम
१२) वडाचे झाड
१३) गाजावाजा, बोभाटा
१६) दारावरील खुणेचा आवाज
१८) सुळे
२१) लाजणारा
२२) बांगला देशाचे चलन
२४) दिवसाचा चोविसावा भाग
२५) ठाणवई
२७) चांदी
२८) भरतीच्या विरुद्ध
२९) दासबोध लिहिणारे संत
३१) आनंद
३३) उदा आंबा, फणस, पेरू इ
३४) धावणे
३६) मगज
३८) परीक्षा, तपासणी
३९) पशू
४१) थुंकीचे पात्र
४३) पृथ्वी
४५) संधी, मोका
४६) किटक
४७) समाचार
५०) गावाखालची जमीन
५२) हक्क सांगणारा, खटला दाखल करणारा
५४) श्रीफळ
५५) तात्काळ
५७) मातीचा कण
५८) कलमापासून तयार झालेले
५९) राणा प्रतापच्या घोड्याचे नाव
६१) ओलसर
६३) करार, भिस्त
६६) समोरासमोरची चकमक
६७) कबूतर
६८) अरण्यवास
७०) गणपतीचे एक नाव
७१) नाव ठेवण्याचा विधी
७४) प्रॅक्टिस (म.)
७६) कहाणी
७७) रुग्णालय
७८) मलई

उभे शब्द :-
२) नवरदेव
३) चिकटून राहाणे
४) अखेर,
५) गुप्त बातमी सर्वांना समजणे
६) लिहिता वाचता येणे
७) डोळे
८) शोध तपास
९) आश्चर्याची गोष्ट
१०) आश्रय
१४) हत्ती
१५) किरकोळ सामान
१७) ऋण
१९) विजयादशमी
२०) सकस
२३) अंजन
२६) चामखीळ
२८) परिचय
३०) सुसर
३२) एक माणूस बसेल अशी छोटी बैलगाडी
३४) परभारे
३५) विविध प्रकार
३७) साखरेचा रस
३९) एक बारीक धान्य
४०) इतर, बाकीचे
४१) त्रासदायक, पीडा उत्पन्न करणारे
४२) घरोघर
४४) शर्करा
४५) कडक व चिवट
४८) मजबूत
४९) वार्ताहर
५०) कच्चे लिखाण (इं )
५१) इतर, शिल्लक राहिलेले
५३) चंद्र
५४) कळलाव्या मुनि
५६) नेहमी,
६०) तृष्णा
६३) युक्ती, मान्यतेचा शेरा
६४) पाठविलेला
६५) उष्ण, जळजळीत
६६) श्वशुर
६७) सरबत इ पेय
६८) दावानल
६९) वाईट इच्छा
७२) अंतःकरण
७३) दात
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# अंजनगांव बारी-पार्डी (देवी) मार्गावरील भुयारी मार्ग जलमय

**रेल्वे प्रशासनाचे दुर्लक्ष; ग्रामस्थांचा संताप वाढला | काम पूर्ण होईपर्यंत मार्ग बंद करण्याची ग्रामपंचायतीची मागणी**







**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी ( दि.10 )–** अंजनगाव बारी–पार्डी (देवी) मार्गावरील रेल्वे गेट क्रमांक 68 जवळील भुयारी अंडरपास सततच्या पावसामुळे पाण्याखाली गेला असून, वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. मागील पाच दिवसांपासून या मार्गातून प्रवास करणे जीवावर बेतण्यासारखे ठरले आहे. या मार्गातून शाळकरी विद्यार्थी, नागरिक, शेतकरी, दुचाकी–चारचाकी चालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

या भुयारी मार्गाचे काम अजून पूर्ण झाले नसतानाही, रेल्वे प्रशासनाने जुनं गेट बंद करून अंडरपासाचा वापर खुला केला आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाचे पाणी अंडरपासात साचल्याने अदृश्य खड्डे, लोखंडी सळ्या, चिखल, यामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येकडे रेल्वे प्रशासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

### सरपंचांनी व्यक्त केला रोष

पार्डी (देवी) चे सरपंच अक्षय मेश्राम म्हणाले, भुयारी अंडरपासाचे काम पूर्ण न करता, तो वापरासाठी खुला करणे म्हणजे लोकांच्या जीवाशी खेळणे होय. यामुळे वाहतूक ठप्प झाली असून, नागरिक, शेतकरी, विद्यार्थी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यावेळी गावकऱ्यांनी साचलेल्या पाण्यात उभे राहून आंदोलन करत निषेध नोंदवला. या वेळी निलेश महल्ले, श्रीकांत गुरव, प्रवीण चौधरी, सचिन गायधने, योगिता माकडे, पल्लवी वाकोडे, अजय वाकोडे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रुग्णवाहिका चिखलात फसली

10 जुलै रोजी सकाळी पार्डी–उदखेड मार्गावरून जाणारी एक रुग्णवाहिका (ॲम्बुलन्स) चिखलात अडकली. भुयारी अंडरपासात पाणी साचल्यामुळे पार्डीसह अनेक गावांचा संपर्क तुटला होता. गावकऱ्यांच्या मदतीने रुग्णवाहिका बाहेर काढण्यात आली, मात्र या घटनेने प्रशासनाच्या हलगर्जीपणाचे वास्तव उघड केले. या प्रकारामुळे गावात संतापाची लाट उसळली आहे.



### जोडणी तुटली, संपर्क तुटला

अंजनगाव बारी–पार्डी (देवी) हा मार्ग अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गाशी जोडला गेलेला असून, भविष्यात सुरू होणाऱ्या बेलोरा विमानतळासाठी महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. या मार्गावरून दररोज शेकडो वाहने धावत असतात. मात्र पावसाळ्यात भुयारी मार्ग जलमय झाल्यामुळे दुचाकी, शाळेची वाहने, बैलगाड्या आणि प्रवासी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. यामुळे गावांचा संपर्क तुटला असून, शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे अवघड झाले आहे.

### काम पूर्ण होईपर्यंत मार्ग बंद करा, अन्यथा तीव्र आंदोलन

पार्डी (देवी) ग्रामपंचायतीने यापूर्वीही हा मार्ग काम पूर्ण होईपर्यंत बंद ठेवावा, अंडरपासातील पाणी उपसण्याची तातडीने व्यवस्था करावी, पर्यायी मार्ग विकसित करून नियमित वाहतूक सुरळीत करावी, अपघात टाळण्यासाठी इशारा फलक व सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अंडरपासातील पाणी उपसण्याची तातडीने व्यवस्था करावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली होती. 1 जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले होते. मात्र आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये रोषाचे वातावरण आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# जनसुरक्षा विधेयक हाणून पाडा

**संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रेमकुमार बोके यांची तीव्र टीका**



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.10 )** – महाराष्ट्र सरकार आणत असलेला जनसुरक्षा कायदा हा समाजात जनजागृती करीत असलेल्या विविध सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार,लेखक व सर्वसामान्य नागरिक यांच्या विरोधात असून या कायद्याच्या आडून सरकार संविधानाने दिलेला अभिव्यक्ती स्वातंर्त्याचा मूलभूत अधिकारच हिरावून घेत आहे असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते प्रेमकुमार बोके यांनी केले आहे.


सध्या सुरू असलेल्या विधानसभेच्या अधिवेशनात सरकार महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक मांडणार असून त्यापूर्वीच महाराष्ट्रात या विधेयकावरून प्रचंड वादळ उठले आहे. नक्षलवादी संघटनांना पायबंद घालण्याच्या नावाखाली हा कायदा आणला जात असला तरी सरकारचा हेतू मात्र पूर्णपणे वेगळाच आहे.कारण या संपूर्ण विधेयकात नक्षलवादी संघटना हा शब्द कुठेच नसून केवळ सरकारी धोरणा विरोधात बोलणाऱ्या संघटना,सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार किंवा जागृत सामान्य नागरिक यांचा आवाज बंद करण्यासाठी हा कायदा आणला जात आहे असे या कायद्याच्या अभ्यासकांचे मत आहे. हा कायदा जर लागू झाला तर सरकारला अमर्याद अधिकार प्राप्त होणार असून त्या माध्यमातून कोणत्याही सामाजिक संघटनेला किंवा त्या संघटनेच्या कार्यकर्त्याला बेकायदेशीर ठरवून त्याला केव्हाही अटक करण्याचे अधिकार सरकारला प्राप्त होणार आहे.त्यानंतर दाखल होणारे गुन्हे हे अजामीनपात्र असून अतिशय कठोर शिक्षेची तरतूद या कायद्यात केलेली आहे.त्यामुळे या कायद्याच्या आडून सरकार सामान्य नागरिकांचे मूलभूत अधिकारच हिरावून घेत असून सरकारच्या विरोधात बोलणाऱ्या लोकांना कायमचे चूप करण्यासाठी सरकार हा कायदा करीत आहे.यामुळे सरकारच्या विरोधात बोलणारे कोणी राहणारच नाही आणि एकप्रकारे सरकारची हुकूमशाही निर्माण होईल. त्यामुळे जनतेने रस्त्यावर उतरून या विधेयकाला जोरदार विरोध केला पाहिजे व हे विधेयक हाणून पडले पाहिजे असे प्रतिपादन प्रेमकुमार बोके यांनी केले आहे.

## 14 जुलैला विभागीय लोकशाही दिन

**अमरावती,( दि.10 )–** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि.14) सकाळी 11 वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# येरड येथील बेंबळा नदीच्या पुलावरील रस्ता बनला चिखलमय

**पावसात पुलावर घाणीचे साम्राज्य, नागरिक संतप्त | आंदोलनाचा इशारा**



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.10 ) –** येरड येथील बेंबळा नदीवरील पुलाची अवस्था अतिशय दयनीय झाली असून, पावसाळा सुरू होताच हा रस्ता चिखलमय झाला आहे. रस्त्यावर साचलेलं पाणी, खोल खड्डे आणि घाणीचं साम्राज्य यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या मार्गाचा वापर येरड, खरबी, मांडवगड परिसरातील शेतकरी, शेतमजूर, महिला व रोजंदारी करणारे कामगार करतात. हा एकमेव मार्ग असल्याने त्यांना रोजचा प्रवास हा संकटमय ठरतो. रस्त्याची अवस्था इतकी वाईट झाली आहे की, पायदळ जाणंही धोक्याचं बनलं आहे. अपघाताची शक्यता लक्षात घेता नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. येरड गावाजवळील बेंबळा नदीवरील हा पूल सुमारे 15 वर्षांपूर्वी बांधण्यात आला होता. मात्र, या पुलावरील रस्त्याची एकदाही योग्य देखभाल किंवा डागडुजी करण्यात आलेली नाही. परिणामी, नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

### साहेब, पुलावरून तुम्ही रोज प्रवास करून दाखवाच!

नागरिकांचा रोष इतका वाढला आहे की त्यांनी थेट प्रशासन आणी लोकप्रतिनिधी यांना विचारत आहे की, साहेब, जर तुम्हाला वाटत असेल की रस्ता ठीक आहे, तर एक आठवडा या पुलावरून दररोज ये–जा करून दाखवा.

# साथरोगावर मात करण्यासाठी सक्रिय सहभाग आवश्यक

## डॉ. प्रमोद पोतदार यांचे आवाहन



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.10 )–** प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय आहे. आरोग्य विभाग जनजागृती करू शकतो, परंतु उपाययोजनांचे पालन करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. डासांची निर्मिती रोखण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केल्यासच हे आजार नियंत्रित करता येतील. डॉ. पोतदार यांनी सर्वांना आरोग्य विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे व डासमुक्त परिसर राखण्याचे आवाहन केले आहे.पावसाळ्यात डासांमुळे पसरणारे आजार मोठ्या प्रमाणात वाढतात. हिवताप, डेंगू, हत्तीरोग व चिकनगुनिया हे कीटकजन्य आजार असून, यांचा फैलाव डासांच्या वाढीमुळे होतो. डास स्वच्छ पाण्यात अंडी घालतात, त्यामुळे घराच्या आजूबाजूच्या टाक्या, माठ, कुलरचे ट्रे, मनी प्लांट, टायर यांसारख्या ठिकाणी अंडी तयार होतात. डॉ. प्रमोद पोतदार यांनी नागरिकांना आवाहन केले की, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. घरातील पाण्याची भांडी, टाक्या स्वच्छ करून उन्हात ठेवावीत व पाण्याच्या टाक्यांवर झाकण असावे.

# सं.गा. बा.अमरावती विद्यापीठाचा नेत्रदान संकल्पात उल्लेखनीय उच्चांक

**426 जणांचा संकल्प**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.10 ) –** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नेत्रदान संकल्प मोहिमेत उल्लेखनीय यश मिळवले असून, नियोजित उद्दिष्टांपेक्षा अधिक जणांनी सहभाग नोंदवत राज्यभरात एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानास विद्यापीठाच्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक वर्गासह सर्व स्तरातून प्रचंड प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाचे आयोजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांच्या कार्यालयातर्फे विद्यापीठाला 300 नेत्रदान संकल्पपत्रे संकलित करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र अपेक्षेपेक्षा अधिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे या समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होत एकूण 426 जणांनी नेत्रदानाचा संकल्प केला. संकल्प केलेल्या सर्व व्यक्तींची माहिती व संकल्पपत्रे विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या माध्यमातून राज्यपाल कार्यालयाकडे सादर करण्यात आली. या संपूर्ण उपक्रमात आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात आणि त्यांच्या कार्यसंघाने मोलाची भूमिका बजावत विशेष परिश्रम घेतले. या अभियानाच्या यशामुळे विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकी व जनजागृतीमधील योगदानाची राज्यभरात चर्चा होत आहे. कुलगुरू डॉ. बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे आणि कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी सर्व संकल्पर्त्यांचे व सहकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून हा एक समाजप्रबोधनाचा आदर्श ठरल्याचे प्रतिपादन केले आहे.

# श्रावण मास आजपासून प्रारंभ

**पुढचे महिनाभर शिवालये गजबजणार**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )–** भारतीय संस्कृतीत विशेष धार्मिक महत्त्व असलेला श्रावण मास आज शुक्रवार, 11 जुलैपासून प्रारंभ होत आहे. 9 ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या पवित्र महिन्यात अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे. भगवान शंकराची उपासना, सात्त्विक जीवनशैली आणि पवित्र नद्यांतील स्नान यामुळे श्रावण मास विशेष पवित्र मानला जातो.

या महिन्यात प्रत्येक सोमवारी शहरातील गहगडेश्वर, तपोनेश्वर, सोमेश्वर व पाताळेश्वर यांसारख्या शिवमंदिरांमध्ये भाविकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळणार आहे. व्रत, उपवास, योग आणि सणांचा संगम असल्याने या महिन्याला अध्यात्मिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्व आहे.

पंडित महेश शर्मा यांच्या माहितीनुसार, या महिन्यात 7 सर्वार्थसिद्धी योग व 1 अमृतसिद्धी योग येणार आहेत. हे योग भाविकांसाठी अत्यंत फलदायी ठरणार आहेत. विशेषत: 23 जुलै रोजी येणारी श्रावण शिवरात्रि ही भगवान शंकराच्या उपासनेसाठी विशेष महत्त्वाची आहे. या दिवशी उपवास, रुद्राभिषेक व रात्रीच्या जागरणाने भक्तांना पुण्य प्राप्त होते.

22 जुलैला येणारा श्रावण प्रदोष व्रत देखील शंकर–पार्वती उपासकांसाठी शुभ संधी आहे. तर 24 जुलैला हरियाली अमावस्या असून, या दिवशी नद्यांमध्ये स्नान करून उपवास व दान केल्यास विशेष पुण्य लाभतो. यापूर्वी 21 जुलैला आषाढ पौर्णिमेच्या दिवशी गुरुपौर्णिमा साजरी होईल. या दिवशी गुरु व भगवान व्यास यांचे पूजन केले जाते, ज्याला व्यासपूजन म्हणतात.

श्रावण महिन्यात नागपंचमी देखील महत्त्वाचा सण असून, यंदा ती श्रावण शुक्ल पंचमीला साजरी केली जाणार आहे. नागदेवतेची पूजा केल्याने शिवकृपा प्राप्त होते, असे शास्त्रात सांगितले आहे.

या महिन्यात हिंदू व मुस्लिम धर्मीय सण एकत्र येत असून, 6 जुलै रोजी मुस्लिम समाजाचा 'मोहरम' साजरा झाला. या दिवशी ताजियांची मिरवणूक, उपवास व इमाम हुसैन यांच्या बलिदानाची आठवण करण्यात आली. श्रावण मासाच्या आगमनाने अमरावती जिल्ह्यात भक्तिपूर्वक, शांतता आणि सामाजिक सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी धार्मिक आचार–विचार जोपासत महिन्याच्या प्रत्येक दिवशी धार्मिक आणि सामाजिक कृतींमध्ये सहभाग दर्शवण्याची तयारी सुरू केली आहे.

### महत्त्वाच्या तिथी

| तिथी | दिवस | सण / व्रत / योग |
|---|---|---|
| 08 जुलै | मंगळवार | आषाढ शुक्ल त्रयोदशीभौम प्रदोष व्रत |
| 11 जुलै | गुरुवार | श्रावण मासाचा प्रारंभ (मराठी पंचांग) |
| 14 जुलै | सोमवार | श्रावणाचा पहिला सोमवार – सिद्ध व गजकेसरी योग |
| 17 जुलै | गुरुवार | सूर्य संक्रांती – गढवाली पंचांगानुसार श्रावण प्रारंभ |
| 21 जुलै | सोमवार | दुसरा सोमवार – सर्वार्थसिद्धी योग |
| 21 जुलै | सोमवार | कामिका एकादशी |
| 22 जुलै | मंगळवार | श्रावण कृष्ण प्रदोष व्रत |
| 23 जुलै | बुधवार | श्रावण शिवरात्रि |
| 28 जुलै | सोमवार | तिसरा सोमवार रवियोग |
| 4 ऑगस्ट | सोमवार | चौथा सोमवार सर्वार्थसिद्धी योग |
| 9 ऑगस्ट | शनिवार | श्रावण समाप्ती (मराठी पंचांग) |


## सार्वजनिक सूचना

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती आणि अधिकार आणि कागदपत्रांच्या आधारे, मी सर्व लोकांसाठी ही सार्वजनिक नोटीस जारी केली आहे, की खरेदी खताची मूळ प्रत मनोहर उद्धवराव मोहोड विक्रेता म्हणून आणि शेख तनविर अहमद शेख हारुन खरेदीदार म्हणून दरम्यान अंमलात आणली गेली आहे. हे खरेदीखत सह दु.नि. चांदुर बाजार च्या सब रजिस्ट्रारकडे रीतसर नोंदणीकृत असलेले अनुक्रमे नोंदणी क्रमांक 1030 दिनांक 09/05/2014 असुन सदर खरेदी खताची ची मुळ प्रती हरवली आहे. ह्या नोटिस द्वारे सर्वत्र लोकांस कळविणेत येते की ज्या कुणाचा ह्या खरेदी संबंधात कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किवा ताबा असेल तसेच कर्ज असेल किंवा अधीकार असेल त्याकरीता नोटिस प्रकाशीत झालेपासुन 07 (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर माहीती वा संबंधीत कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. ह्यानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी

शिक्का

**स्वाक्षरी**
**ॲड. प्रविण भुस्कडे**
**सांगेकर नगर भक्तिधाम रोड**
**चांदूरबाजार**
**जिल्हा अमरावती.**
**मो. क्रमांक 8788355988**

# मस्त मॅक्रोनी चाट

रसगंधा

मॅक्रोनी म्हटल्यावर कोणाच्याही तोंडाला पाणी सुटेल. हा पदार्थ मोठ्यांबरोबरच लहानग्यांनाही खूप आवडतो. मग एखाद्या दिवशी मस्त मॅक्रोनी चाट बनवायला हरकत नाही. घरातली बच्चा पार्टी एकदम खूश होऊन जाईल.



**साहित्य :** एक कप मॅक्रोनी, एक कांदा, एक टोमॅटो, पाव कप स्वीट कॉर्न, चार चमचे शेंगदाणे, चमचाभर लाल तिखट, चाट मसाला, एक चमचा हिरवी चटणी, एक चमचा चिंचेची चटणी, लिंबाचा रस दोन चमचे, मीठ, बारीक शेव आणि कोथिंबिर

**कृती :** कांदा आणि टोमॅटो बारीक चिरून घ्या. मॅक्रोनी उकडून घ्या. पाणी काढून टाका. स्वीट कॉर्न उकडून घ्या. शेंगदाणे भाजून घ्या. आता एका बाऊलमध्ये मॅक्रोनी, कांदा, टोमॅटो, चाट मसाला, तिखट, मीठ, चटण्या हे सर्व पदार्थ घाला. मिसळून घ्या. त्यावर बारीक शेव आणि कोथिंबिरीने सजावट करा. मस्त मॅक्रोनी चाट तयार आहे. संध्याकाळचं खाणं म्हणून हा प्रकार करता येईल.

# अस्मिता

# असे चमकवा जुने फर्निचर

सजावट



घराच्या कोपऱ्यात ठेवलेले आजीच्या काळातील लाकडी कपाट असो किंवा जुने टेबल असो... ते खूपच आकर्षक दिसते. अशा फर्निचरचे एक वेगळेच जुने आणि शाही सौंदर्य असते जे सजावटीच्या आजच्या आधुनिक निकषांमध्येही सहजी सामावते आणि घराची शोभा वाढवते. म्हणूनच भावना आणि सौंदर्याची अजब गुंफण असणाऱ्या अशा गोष्टी निगुतीने जपल्या जातात. पण कालांतराने धूळ, ओलावा आणि घाणीमुळे त्याची चमक नष्ट होते आणि जुने फर्निचर रंगहीन दिसू लागते. मात्र चांगली गोष्ट म्हणजे असे फर्निचर नव्यासारखे चमकदार बनवण्यासाठी महागड्या पॉलिशची किंवा कोणत्याही व्यावसायिकाच्या मदतीची गरज नसते. काही सोप्या घरगुती वस्तू वापरून तुम्ही जुन्या फर्निचरचे सौंदर्य परत मिळवू शकता. कसे ते पाहू या. * यासाठी तज्ज्ञांनी अतिशय सोप्या पद्धतीने घरगुती क्लीनर बनवण्याची मार्ग सांगितला आहे. फर्निचर स्वच्छ करण्याबरोबरच त्याची चमक परत करण्यासाठी याचा वापर अतिशय चांगल्या पद्धतीने होतो. तेव्हा हे क्लिनर बनवण्यासाठी तुम्हाला डिशवॉशिंग लिक्विडचे दोन ते तीन थेंब, पांढरे व्हिनेगर एक कप आणि दीड टेबलस्पून ऑलिव्ह ऑइल हे साहित्य लागेल. अधिक प्रमाणात क्लिनर बनवायचे असेल तर या गोष्टींचे प्रमाण दुप्पट करू शकता. * क्लीनर तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात डिशवॉशिंग लिक्विड, व्हिनेगर आणि ऑलिव्ह ऑइल घ्या. आता या तिन्ही गोष्टी चांगल्या प्रकारे मिसळा. त्यानंतर मिश्रण एका स्प्रे बाटलीत भरा. भरतानाच त्यात थोडे पाणी घाला जेणेकरून ते हलके आणि वापरण्यास सोपे होईल. लक्षात घ्या, ऑलिव्ह ऑइल हा या क्लिनरमधील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. म्हणूनच मिश्रणात योग्य मात्रेमध्ये त्याचा वापर करा. या मिश्रणाने फर्निचर स्वच्छ केल्यास चांगले परिणाम बघायला मिळतील याची खात्री बाळगा.

– मंजिरी ढेरे

# वयोवृद्ध योगसाधिका

मानिनी

शिकण्यासाठी किंवा आवड जोपासण्यासाठी वयाची कोणतीही अट नसते, हेच खरे. हे सिद्ध करणारी अशीच एक कहाणी आहे १०१ वर्षीय फ्रेंच योग शिक्षिकेची. गेल्या वर्षी त्यांना भारतीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले. हा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार असून शार्लोट चोपिन तो मिळवणाऱ्या चार फ्रेंच नागरिकांपैकी एक आहेत. वयाच्या १०१ व्या वर्षी, शार्लोट चोपिन आपल्याला योगाचा खरा अर्थ शिकवत आहेत. त्यामुळेच वय ही फक्त एक संख्या आहे, या वस्तुस्थितीचे त्या प्रतीक आहेत, असेच म्हणावे लागेल.

फ्रान्स आणि युरोपमध्ये योग लोकप्रिय करण्यासाठी तसेच शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानासाठी शार्लोट चोपिन यांना 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला. देण्यात आला होता. शार्लोट यांनी सिद्ध केले की, योगसाधना करण्यासाठी आणि शिकवण्यासाठी कोणतेही वय नसते. १०० वर्षांची वय ओलांडल्यानंतरही त्या दररोज योगाचा सराव करतात. त्यांच्या मते, योग केवळ शरीराला लवचिकता देण्याचे साधन नाही तर त्यामध्ये मानसिक आणि आध्यात्मिक शिस्तदेखील आहे. शार्लोट यांनी स्वतः ५० व्या वर्षी योग करायला सुरुवात केली आणि लवकरच त्यात प्रभुत्व मिळवली. पुढे १९८२ मध्ये फ्रान्समध्ये शार्लोट चोपिन यांनी योग शिकवण्यास सुरुवात केली. फिटनेस युगाच्या विस्तारासोबत त्यांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली. आज फ्रान्समध्ये फिटनेस आणि मानसिक शांती शोधणाऱ्यांसाठीच्या योग सर्वात प्रमुख पद्धतींपैकी एक आहे. अर्थातच त्यात शार्लोट चोपिन यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.



आजही त्या न थांबता नियमितपणे योग करत आहेत. थोडक्यात सातत्य ही यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. फ्रान्समध्ये योग लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्याचमुळेच पूर्वी लोकांना फारसे माहिती नव्हते त्या देशात आज योगसाधना करणारे अनेकजण पहायला मिळतात. शार्लोट चोपिन यांचे जीवन आपल्याला शिकवते की, हेतू आणि समर्पण खरे असेल तर वय ही फक्त एक संख्या राहते. त्यांची कहाणी जीवनात आरोग्य, संतुलन आणि शांती हवी असणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

– मेघना जोशी

# सकारात्मक विचार कर

सध्या माझी मनस्थिती द्विधा झाली आहे. पालक किंवा प्रियकर यांच्यातल्या एकाची निवड करण्याची वेळ माझ्यावर आली आहे. माझं एका मुलावर प्रेम आहे. पण घरच्यांना हे लग्न मान्य नाही. या मुलाशी लग्न केलं तर सगळे संबंध तोडून टाकण्याची धमकी माझ्या पालकांनी दिली आहे. माझी आई सतत आजारी असते. त्यामुळे तिला दुखवायचं नाही. मी आमचं नातं त्यांच्यापासून लपवलं. मात्र नात्याबद्दल कळल्यानंतर त्यांना मोठा धक्का बसला.



काय करू?

मी आजवर पालकांशी कधीच मोकळेपणाने बोलले नव्हते. त्यामुळे हे नातं उघड करणं जड गेलं. त्यातच प्रियकराचंही माझ्यावर खूप प्रेम आहे. तोही माझ्याशिवाय राहू शकत नाही. मी काय करू?

– तुझ्या पालकांना धक्का बसला आहे. त्यामुळे तो पचवण्यासाठी तू थोडा वेळ दे. त्यांना या सगळ्यातून बाहेर येऊ दे. तुझ्या अशा वागण्याचं त्यांना दुःख झालं असेल. वातावरण निवळल्यावर शांतपणे पालकांशी बोल. त्यांना तुझी बाजू पटवून दे. हवी तर माफी माग. दुखवायचा कोणताही उद्देश नसल्याचं सांग. शक्य असेल तर तुझ्या प्रियकराची पालकांशी भेट घडव. अजिबात घाई करू नकोस. सकारात्मक विचार कर. तुझ्या प्रियकरालाही विश्वासात घे. पालकांना समजावण्यासाठी आप्तांची मदतही घेता येईल.

# पूर्वतयारी गरजेची

स्कील डेव्हलपमेंट



घरच्या जबाबदाऱ्या, मुलांचं पालनपोषण अशा अनेक कारणांसाठी महिलांना करिअरमधून ब्रेक घ्यावा लागतो. मात्र या जबाबदाऱ्या संपल्या, मुलं जाणती झाली की महिला नव्याने कामाला सुरूवात करतात. अर्थात मधल्या काळात बरेच बदल झालेले असतात. आपला या क्षेत्राशी संपर्क तुटलेला असतो. कामाचं स्वरुप बदललेलं असतं. अशा स्थितीत लगेच नोकरी मिळत नाही. ब्रेकनंतर करिअरची सुरूवात करताना पूर्वतयारी करायला हवी. नोकरीच्या दृष्टीने स्वतःला तयार करायला हवं. तेव्हा स्वतःचं नाणं खणखणीत वाजवण्यासाठी काय करता येईल? जाणून घेऊ.

* नोकरीसाठी स्वतःला पुन्हा एकदा सज्ज करण्याआधी स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा. यासाठी काही नवी कौशल्यं विकसित करता येतील. आपण पुन्हा एकदा जोमाने काम करू, हा विश्वास तुमच्यात असायला हवा.

* इंटरनेटमुळे सगळं काही सुलभ झालं आहे. विविध पोर्टल्सवरून नोकरीसाठी अर्ज करता येईल. आपल्या क्षमता आणि पात्रतेनुसार नोकरीसाठी अर्ज करता येईल. तुमच्या क्षेत्रात नवे बदल घडले असतील, नवं तंत्रज्ञान आलं असेल तर त्याचं प्रशिक्षण घेता येईल.

* तांत्रिक ज्ञान देण्यासाठी विविध कार्यशाळांचं आयोजन केलं जातं. आपल्या क्षेत्राशी संबंधित कार्यशाळांमध्ये नाव नोंदवता येईल. कार्यशाळांमध्ये सहभागी झाल्यामुळे तुमचा रेझ्युमे अधिक बळकट होईल.

* नोकरी करण्याबद्दल तुम्ही साशंक असाल तर फ्रीलान्स काम करता येईल. विविध कंपन्यांशी संपर्क साधून घरूनच काम सुरू करा. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. कामाचा अनुभव मिळेल आणि पुढे चांगल्या पगाराची नोकरी मिळवणं सोपं जाईल.

# ...म्हणून कसवू आहे खास

वारसा

प्रत्येक राज्याची स्वतःची खास साडी असते. ती त्या ठिकाणची संस्कृती आणि परंपरा प्रतिबिंबित करते. केरळची प्रसिद्ध कसवू साडी देखील अशीच एक सुंदर आणि पारंपरिक असून संपूर्ण भारतात वेगळी ओळख टिकवून आहे. केरळमधील महिला विशेषतः सण आणि विशेष प्रसंगी ती परिधान करतात. पण तुम्हाला माहिती आहे का की या पांढऱ्या रंगाच्या साडीतील सोनेरी बॉर्डरचा अर्थ काय आणि त्याची खासियत काय? आज जाणून घेऊ या.

*साडीला हे नाव 'कसवू' या शब्दावरून पडले असून त्याचा अर्थ 'जरी' म्हणजे साडीच्या कडांवर सोन्याच्या धाग्याने केलेली सजावट असा होतो. म्हणजेच या साडीला तिची सोनेरी किनार खास बनवते. केरळमध्ये पुरुष धोतर नेसतात, त्याला 'कसवू मुंडू' म्हणतात. याचा अर्थ जरीसह धोतर...

*महाराजा बलराम वर्मा आणि त्यांचे मंत्री उम्मिनी थंपी यांच्या काळात कसवू साडीची सुरुवात झाली. त्यांनी तमिळनाडूतील विणकरांना केरळमध्ये बोलावले आणि बलरामपुरममध्ये ही साडी बनवण्यास सुरुवात केली. आजही बलरामपुरम या साडीसाठी प्रसिद्ध असून तेथील उत्पादन हा पारंपरिक वारसा अभिमानाने जपत आहेत.



*या साडीची बॉर्डर बनवण्यासाठी सोन्याचे बारीक धागे वापरले जातात. ते साडीच्या कडांवर खुमासदार पद्धतीने विणलेले असतात. त्यामुळे या साडीची किंमत काही लाख रुपयांपर्यंत असते. तथापि, आता काळानुसार स्वस्त धाग्यांपासून देखील वापर केला जात असल्यामुळे साडीची किंमत कमी होते.

*कसवू साडीचा पांढरा रंग शुद्धता आणि पावित्र्याचे प्रतीक आहे सोन्याची किनार संपत्ती आणि समृद्धी दर्शवते. म्हणूनच केरळच्या महिला विशेषतः लग्न, सण आणि धार्मिक प्रसंगी ती नेसतात. ही साडी शुभेच्छा आणि सकारात्मक उर्जेचे प्रतीक देखील मानली जाते. एक साधी साडी बनवण्यासाठी तीन ते पाच दिवस लागतात. भरगच्च डिझाइन असणारी साडी पूर्ण होण्यासाठी तर काही महिनेही लागू शकतात. त्यामुळेच ही केवळ साडी नाही तर आपला सांस्कृतिक वारसा आणि परंपरेचे उदाहरण आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

– वैष्णवी कुलकर्णी

# गर्भवतींनो, काळजी घ्या

आला पावसाळा



देशात वेळेआधीच दाखल झालेला मान्सून आता चांगलाच स्थिरावला आहे. पण पावसासोबतच अनेक आजार आणि संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळेच विशेषतः गर्भवती महिलांनी या ऋतूत आरोग्याची अधिक काळजी घेणे महत्त्वाचे आहे. पावसाळ्यात संसर्गाचा धोका दुप्पट होतो. त्यामुळे गर्भवती महिलांनी स्वतःची आणि पोटातील बाळाची विशेष काळजी कशी घ्यावी ते आता पाहू या.

*** घर स्वच्छ ठेवा**

पावसाळ्यात बॅक्टेरिया आणि बुरशी वेगाने पसरतात. म्हणूनच धोका टाळण्यासाठी घराच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. बाथरूम आणि फरशी दररोज अँटीबॅक्टेरियल साबण किंवा लिक्विड क्लिनरने स्वच्छ करा. घरात ओलावा आणि बुरशी तयार होऊ देऊ नका. कडुलिंबाची पाने जाळल्याने घराचे वातावरण स्वच्छ राहते.

*** पावसात भिजणे टाळा**

गर्भवती महिलांनी पावसात भिजणे टाळावे. थंडी वाजल्यास संसर्ग आणि फ्लूचा धोका वाढतो, जो आई आणि बाळ दोघांसाठीही हानिकारक असू शकतो.

*** निरोगी आणि ताजे अन्न खा**

पावसात अन्नामुळे संसर्ग होण्याचा धोकाही मोठा असतो. म्हणूनच घरी चांगले शिजवलेले ताजे अन्न खा. पॅक केलेले वा जंक फूड टाळा. तसेच भरपूर पाणी आणि ताजे रस प्या. यामुळे शरीरात पाण्याची कमतरता भासणार नाही.

*** डासांपासून संरक्षण करा**

पावसाळ्यात मलेरिया, डेंग्यू यासारखे आजार पसरवणारे डास वाढतात. त्यांना प्रतिबंध करण्यासाठी सकाळी आणि संध्याकाळी घराचे दरवाजे आणि खिडक्या बंद ठेवा. तसेच मच्छरदाणी आणि रिपेलेंट्सचा अवश्य वापर करा.


*** स्वच्छता राखा**

संसर्ग टाळण्यासाठी साबणाने वारंवार हात धुवा किंवा हँड सॅनिटायझर वापरा. काहीही खाण्यापूर्वी आणि नंतर हात स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे. या हंगामात पाणी साचलेल्या भागात अडकण्याचा धोका असतो. म्हणून, अनावश्यक बाहेर जाणे किंवा धोकादायक भागात प्रवास करणे टाळा.

– पंकजा देव

हेअर केअर

## फक्त एका मास्कमुळे...



फक्त एका हेअर मास्कमुळे तुमचे केस काळे, दाट आणि घनदाट होऊ शकतात. यासाठी अर्धा कप कोरफडीची पूड घ्या. तुम्ही गरही वापरू शकता. त्यात अर्धा कप जास्वंद पूड घाला. आता त्यामध्ये मेथी भिजवलेलं पाणी घाला. शेवटी रोझमेरी तेलाचे काही थेंब घालून मास्क तयार करा. आता हा मास्क केसांना लावा. साधारण दोन तासांनी धुवून टाका. केसांची चमक वाढवण्यासाठी आठवड्यातून दोन वेळा हा उपाय करा.

ॲक्सेसरीज


## अशी निवडा पादत्राणं



खरेदी करताना पादत्राणांकडे दुर्लक्ष होता कामा नये. विशेषतः महत्त्वाच्या प्रसंगासाठी पादत्राणं घेताना बजेटपेक्षाही आपल्या आवडीचा विचार करावा. खास प्रसंगासाठी पादत्राणंही खासच असली पाहिजेत. ट्रेंड आणि स्टाईलसोबतच तुमचा कम्फर्टही महत्त्वाचा आहे. काही खास प्रसंगी बराच काळ उभं रहावं लागतं. त्यामुळे आरामदायी पादत्राणांची निवड करा. कपड्यांनुसार पादत्राणांची निवड करा. पादत्राणांच्या दोन जोड्या सोबत ठेवा.

स्टे सेफ

## बॅक्टेरियांना म्हणा बाय बाय



आपल्या घरात असंख्य बॅक्टेरिया असतात. त्यांच्यामुळे सर्दी-खोकला, ताप अशा व्याधी जडतात. म्हणूनच घर बॅक्टेरियामुक्त असायला हवं. यासाठी उश्यांचे अभ्रे, चादरी दर पंधरा दिवसांनी धुवा. दर दोन वर्षांनी उशा बदला. गादी अधूनमधून मोकळ्या हवेत, उन्हात ठेवा. यामुळे गादीतले बॅक्टेरिया मरून जातील.

## रस्त्यासाठी शेतकऱ्याने केला
# दुसऱ्यांदा आत्महत्येचा प्रयत्न



■ **महासागर प्रतिनिधी, चिमूर, दि. १० :**
रस्त्याच्या मागणीकरिता तीन वर्षांपूर्वी आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्याच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याने त्रस्त शेतकऱ्याने आज पुन्हा दुसऱ्यांदा आत्महत्येचा प्रयत्न केला.

चिमूर तालुक्यातील माकोना - गिरोला रस्त्याकरीता व रस्ता मंजुरीकरिता शेतकऱ्यांनी अनेक आंदोलने केली. त्यानंतर या रस्त्याला मंजुरी मिळाली. या रस्त्याचे काम गुप्ता कंट्रक्शन कंपनी यांना देण्यात आले. परंतु ० ते ६०० कि.मी अंतर रस्ता मंजुरी असताना १५० मिटर रस्ता खडीकरण झाले नाही. सदर रस्त्याच्या डांबरीकरणास मंजुरी देण्यात आली आहे. परंतु कंत्राटदार हलगर्जीपणा करत आहे, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. प्रशासन सुध्दा या रस्त्याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे आज शेतकऱ्यांनी तिव्र आंदोलन सुरू केले होते.

जाण्यायेण्याच्या मार्गावर मोठा नाला पडला असून, कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्यामुळे ही स्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने मथुरादास उर्फ गोपाला फुलसे या शेतकऱ्याने गवत फवारणी करण्याचे औषध प्राशन करीत आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र उपस्थित शेतकऱ्यांनी धाव घेऊन त्याचा बचाव केला.

घटनेची माहिती होताच पोलीस प्रशासनासह साबांवि चिमुरचे उपविभागीय अभियंता उपगनलावार, तहसीलदार श्रीधर राजमाने यांनी घटनास्थळी भेट दिली. सदर रस्ताचे बांधकाम तातडीने सुरू केले जाईल असे आश्वासन दिले. परिणामी, आंदोलन स्थगित करण्यात आले.

या आंदोलनात जगदीश मेश्राम, चंद्रकांत पिपंळकर, श्रीराम धोटे, लोकनाथ रामटेके सरपंच सावरी, संदिप कावळे, मारोती बोबडे, जया कन्नाके, वनिता पिपंळकर, सुरेखा शेंबेकर आदी शेतकरी उपस्थित होते. रस्ता न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## डोक्यात सिलिंडर हाणून
# पत्नीचा खून

■ **महासागर प्रतिनिधी**
**यवतमाळ, दि. १० :**
वाघापूर परिसरात बुधवारी रात्री उशिरा एका पतीने आपल्या पत्नीचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चारित्र्यावर संशय घेत झालेल्या वादातून पतीने पत्नीच्या डोक्यावर गॅस सिलेंडर घालून तिचा निर्दयपणे खून केल्याचे उघड झाले आहे. जिल्ह्यात २४ तासात पतीने पत्नीची हत्या केल्याच्या दोन घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

मृत महिलेचे नाव इंद्रकला विजय जयस्वाल (४७) असून आरोपी पतीचे नाव विजय शंकरलाल जयस्वाल (५३) असे आहे. पती विजय याला पत्नी इंद्रकलाच्या वर्तणुकीवर संशय होता. या कारणावरून त्यांच्यात सतत वाद होत होते.

रात्री दोघांत पुन्हा एकदा वाद उफाळून आल्यावर रागाच्या भरात विजयने घरात असलेला गॅस सिलेंडर उचलून थेट इंद्रकलाच्या डोक्यावर घातला. या जोरदार आघाताने इंद्रकला जागीच कोसळली. यामध्ये डोक्यातून रक्तस्राव होवून तिचा मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपी विजय जयस्वाल याला अटक केली आहे. पुढील तपास लोहारा पोलीस करत आहेत.

## रस्ते अन् पुलासह पूरपीडितांचेही
# हाल.. बेहाल!





■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १० :**
पूर्व विदर्भात विशेषतः भंडारा, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या चार दिवसांत झोडपून काढलेल्या मुसळधार पावसाने अनेक रस्ते, पुलाची दुर्दशा झाली असून, पावसासह पूराचा फटका बसलेल्या कुटुंबाचेही हाल बेहाल आहेत.

पावसाने उसंत घेतल्यानंतर पूर ओसरला असला याचा फटका बसलेल्या नागरिकांच्या डोळ्यातून आजही आसवांचा पूर वाहतो आहे.

मागील चार दिवसात पूर्व विदर्भातील अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपून काढले. याचा सर्वाधिक फटका भंडारा जिल्हा आणि नागपूर शहरासह जिल्ह्याच्या काही भागाला बसला. शेकडो नागरिकांचया घरात पावसाचे आणि पुराचे पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घरातील साहित्याचे मोठया प्रमाणात पहिल्याच पावसात नुकसान झाले. कित्येकांच्या घरातील धान्य पूर्णतः भिजले असून, कपडेलत्ते आणि अन्य साहित्याची मोठीच हानी झाली. वाहतुकीचे अनेक मार्ग बंद पडले तर कित्येक घरांची पडझड झाली.

भंडारा गोंदियाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी भेटून भंडारा शहरातील नागरिकांची व्यथा सांगितली. तत्काळ पंचनामे करून शासनाकडून नुकसान ग्रस्त कुटुंबांना मोबदला द्यावा. अशी मागणी त्यांनी केली आहे.

भंडारा शहराबाहेरून नवा बायपास रस्ता तयार करण्यात आला. मात्र नवीन बायपास रस्त्याची पिचिंग वाहून गेली. पाच दिवसाआधी या पुलाचे लोकार्पण करण्यात आले होते.

पावसामुळे रस्ते उखडले असले तरी पर्याय नसल्याने याच मार्गावरून वाहतूक सुरू असून, अपघाताची शक्यताही बळावली आहे.

# उद्घाटनासाठी सज्ज असलेला उड्डाणपूल खचला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :**
नागपूर येथील रस्ते, उड्डाणपुले व इतर विकासकामे ही चांगल्या दर्जाची असतील असा अनेकांचा समज असला तरी तो गैरसमज आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदारसंघातील उद्घाटनासाठी सज्ज असलेल्या उड्डाणपुलाचा रस्ता खचला असल्याचे समोर आले आहे.

उड्डाणपूल बांधून तयार झाला असून त्याचे उद्घाटन बाकी राहिले होते. परंतु, पावसात उड्डाणपुलावारील रस्ता खचला आहे. कामठी ते न्यू कामठीला जोडणारा हा उड्डाणपूल आहे. जोरदार पावसामुळे मोठे मोठे खड्डे देखील पडल्याचे समोर आले आहे. सुदैवाने याचे उद्घाटन बाकी असल्याने वाहतूक अद्याप सुरू करण्यात आलेली नाही, त्यामुळे

## महसूल मंत्री बावनकुळेंच्या मतदारसंघातील परिस्थिती



कुठलीही जीवितहानी झाली नाही.

नागपूर शहराचा विकास होत असला तरी या कामांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. उद्घाटन होण्यापूर्वीच कामठी ते न्यू कामठी अशा या उड्डाणपुलावर मोठे खड्डे पडल्याचे तसेच एका ठिकाणी रस्ता खचल्याचे समोर आले आहे.

हे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, कंत्राटदारांचा निष्काळजीपणा उघडकीस आला आहे. हा सार्वजनिक निधीचा अपव्यय नव्हे तर सर्व सामान्य लोकांच्या जीवनाशी खेळण्याचा प्रकार असल्याची संतप्त प्रतिक्रिया येथील नागरिक देत आहेत.

या पुलाचे तत्काळ स्ट्रक्चरल ऑडिट करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित कंत्राटदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

## साऊथ इंडियन लोकांनी अवघा महाराष्ट्र नासवला
### आमदार गायकवाड पुन्हा बरळले

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**
आमदार निवासातील कँटिनमध्ये शिळे



आणि निकृष्ट जेवण दिल्याच्या कारणावरून व्यवस्थापकाला मारहाण करणारे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आपल्या कृतीचे समर्थन करत नवा वाद निर्माण केला आहे. साऊथ इंडियन लोकांनी डान्सबार आणि लेडीज बारच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती बिघडवली. मग विरोधकांना त्यांच्यासाठी एवढा पुळका कशाला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

गायकवाड म्हणाले की, मी ज्याला मारहाण केली तो वेटर नव्हता तर तो मॅनेजर होता. आता त्याला मालकाने सस्पेंड केले आहे. तो लाखो लोकांच्या आरोग्याशी खेळत होता. मी २० वर्षांपासून पोटाच्या आजाराने त्रस्त आहे आणि ते जर मला विषारी जेवण देणार असतील आणि मला जर काही त्रास होणार असेल तर माझी रिॲक्शन चुकीची नव्हती.

# भक्तिरसात न्हावून निघाली श्री संतनगरी



■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १० :**
गुरु पौर्णिमेच्या पर्वावर संत गजानन महाराजांनाच आपला गुरु मानणाऱ्या राज्यातील भाविकांची गुरूवारी विदर्भ पंढरी शेगाव मध्ये मांदियाळी झाली.

संत गजानन महाराजांचा दिवस गुरुवारीच यंदाची गुरु पौर्णिमा आल्याने हजारो भाविकामध्ये एक वेगळाच उत्साह दिसून आला. हजारो भाविकांचा मेळा, महाराजांच्या शिष्यानी फुलेलेले संत गजानन महाराज संस्थान मंदिर, समाधी स्थळाच्या दर्शनासाठी लागलेल्या दीर्घ रांगा, गण गण गणात बोते च्या गजराने दुमदूमणारा मंदिर परिसर, भाविकांनी फुललेले मंदिराकडे येणारे रस्ते असे गुरुवारी, संतनगरीचे चित्र होते.

नुकताच आषाढी एकादशी सोहळा पार पडला. या दिवशी लाखावार भाविकांनी शेगाव नगरीत हजेरी लावली आणि ते समाधी स्थळी नतमस्तक झाले. हजारो भाविकांनी गुरु पौर्णिमा निमित्त गुरु चरणी लीन होण्यासाठी संत नगरीत हजेरी लावल्याचे दिसून आले.

आज गुरुवारी सकाळ पासूनच भाविकांचे आगमन सुरु झाले. दुपारी बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भ आणि राज्यातील भाविक यांची गर्दी वाढली. यामुळे सकाळ च्या तुलनेत संस्थान मंदिर परिसरात दर्शनसाठी दीर्घ रांगा लागल्याचे चित्र होते. सकाळी अर्धा एक तासात होणाऱ्या दर्शनसाठी दीड दोन तास लागत होते.

गजानन महाराजांनी शेगाव नगरीत दीर्घ काळ वास्तव्य केले. महाराजांनी भक्तांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या व्यथा, संकटे दूर केली. यामुळे पिढ्यानं पिढ्या त्यांना भाविकांनी दैवत आणि गुरु मानले. ही गुरु शिष्यची परंपरा आजच्या संगणक युगातही कायम आहे.

## अहीरांनी विधानपरिषदेत काढली
# निशिकांत दुबेची कुंडली

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० :**
भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी आणि महाराष्ट्राबद्दल वादग्रस्त विधान करत मनसे प्रमुख राज ठाकरे तसेच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती. महाराष्ट्राला आम्ही पोसतो, असे विधान दुबे यांनी केले होते.



परंतु, निशिकांत दुबे यांचा मुंबईत फ्लॅट असून तो भाडे तत्त्वावर दिला असल्याची माहिती शिवसेना ठाकरे गटाचे नेते सचिन अहीर यांनी दिली.

निशिकांत दुबे यांच्याबद्दल माहिती देताना सचिन अहीर म्हणाले, निशिकांत दुबे मुंबईत १६ वर्षे राहिले आहेत. ठाकरे बंधू आणि मराठी माणसावर टीका करताना मुंबईत आपला फ्लॅट आहे याचा विसर त्यांना पडला असल्याचे अहीर म्हणाले. तसेच मुंबई येथील खार झुलेलाल अपार्टमेंटमध्ये ते राहत होते. निशिकांत दुबे, ४०४, झुलेलाल अपार्टमेंट, मार्ग क्रमांक १६, खार पश्चिम, असा त्यांचा पत्ता होता, अशी माहिती सचिन अहीर यांनी दिली आहे.

निशिकांत दुबे यांनी २००९ साली निवडणूक लढवली होती. त्यावेळी या फ्लॅटचा उल्लेख आपल्या मालमत्ता यादीत केला होता. १९९३ ते २००० या कालावधीत निशिकांत दुबे हे मुंबईत नोकरी करत होते. इथे नोकरी करत संचालक पदापर्यंत त्यांनी प्रगती केली. मात्र, मुंबईत राहिलेल्या या नेत्याला मुंबईच्या वास्तव्याचा विसर पडलेला दिसत आहे.

अहीर म्हणाले, निशिकांत दुबे यांनी खारमधील मालमत्ता ही १ कोटी ६० लाख रुपयांना विकत घेतली होती, यासह इतरही माहिती सभागृहात देत सचिन अहिर यांनी त्यांची कुंडलीच काढली.

# खासदार दुबेंचा यू टर्न

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी आणि महाराष्ट्राच्या बाबतीत वादग्रस्त विधान केले होते. त्यावरून त्यांच्यावर चांगलीच टीका केली जात होती. आता त्यांनी त्यांच्या वक्तव्यावरून माघार घेतल्याचे दिसत आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात मराठी आणि महाराष्ट्राचे योगदान फार मोठे असून देशाच्या इकॉनमीमध्ये देखील जास्त योगदान असल्याचे दुबे यांनी म्हटले आहे.

दुबे म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यात मराठीचे योगदान खूप मोठे आहे. जसा मराठी भाषेचा सन्मान आहे, तसाच कन्नड भाषेचा आहे, तमिळ भाषेचा आहे. भाषेच्या मुद्द्यावरून जर ठाकरे कुटुंब मारहाण करत असेल तर हे आमच्या सहनशक्तीच्या बाहेर आहे. पुढे बोलताना निशिकांत दुबे म्हणाले, महाराष्ट्राचे या देशाच्या आर्थिक स्थितीत मोठे योगदान आहे. हे कोणी नाकारत नाही. मी जे म्हटले त्याला चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आले.

# काय वागणं, काय माज, एकदम ओके...

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्यावर शेलक्या शब्दांत टीका केली आहे.

## अंजली दमानियांचा टोला



आपल्याला महाराष्ट्राला किती सभ्यस सुसंस्कृत व विचारवंत आमदार लाभलेत नाही का? असा उपरोधिक सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

आपल्या महाराष्ट्राला किती सभ्य, सुसंस्कृत व विचारवंत आमदार लाभले आहेत नाही का? शहाजी बापूंच्या भाषेत सांगायचे तर, काय वागणं, काय बोलणं, काय माज... एकदम ओके? आम्ही निवडून दिलेले आमदार काहीच करत नाहीत, फक्त पैसे खातात, ना दर्जेदार रस्ते ना चांगले पूल ना धरणे, काहीच दर्जेदार नाही, अशी टीका त्यांनी केली आहे.

## आमदार गोपीचंद पडळकरांच्या विरोधात
# ख्रिस्ती बांधव रस्त्यावर




■ **महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. १० :**
शांत, संयमी ख्रिस्ती बांधवात अनेक वषानंतर सात्विक संताप दिसून आला. या समुदायाला आज मात्र रस्त्यावर उतारावे लागले. जिल्हा मुख्यालयी निषेध मोर्चा काढावा लागला. याला कारण ठरले, भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या वादग्रस्त विधानाबद्दल भाजप पक्षश्रेष्ठी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी त्यांना योग्य ती समज द्यावी, त्यांच्या पदाचा (आमदारकीचा) राजीनामा घ्यावा या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात आला.

स्थानिय साने नगर परिसरातील चर्च ऑफ नाझरीन येथून या मोच्यार्ला शांततेत प्रारंभ झाला. रेव्हरंड सुहास गुर्जर, रेव्हरंड विजय पलघामोल, बोरघाटे, सोनारे, गायकवाड, बाबुराव डोंगरदिवे, पास्टर हर्षानंद डोंगरदिवे, बोरकर, खंडारे, कांबळे, जगदीश शिंदे, पाटोळे यांच्या मार्गदर्शनात हा मोर्चा काढण्यात आला.

या मोर्च्यात बुलढाणा शहरासह जिल्ह्यातील शेकडो धर्म बांधव सहभागी झाले. मोर्च्यात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. चर्च मार्ग कारंजा चौक, जिल्हा न्यायालय मार्ग, बिएसएनल कार्यालय या मार्गाने निघालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर येऊन धडकला.

यावेळी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध करून त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी किरण पाटील यांना निवेदन सादर केले.

बुलढाण्यात हा मोर्चा वेगळा ठरला. निषेध मोर्चा असला तरी अत्यंत शांततेत, संयम ठेवून हा मोर्चा काढण्यात आला. कोणताही आक्रस्ताळेपण न करता, आक्रमक घोषणा न देता हा मोर्चा काढण्यात आला. मोर्च्यात भाजप नेत्यांनी गोपीचंद पडळकर यांना समज द्यावी व योग्य ती कारवाई करावी, त्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल करावे अशी मागणी करीत समुदायने आपला सात्विक संताप व्यक्त केला. यात ख्रिस्ती बंधु, भगिनींसह धर्मगुरू सहभागी झाले होते.

# वणीच्या देवयानीने केले रक्त वाहिन्यांमधील गाठी रोखण्याचे संशोधन

■ **संजय चिंचोळकर, वणी दि. १० :**
वाढते वय, कोलेस्ट्रॉल तसेच इतर आजारांमुळे शरीरातील रक्त घट्ट होऊन, रक्त वाहिन्यांमध्ये गाठी (थ्रोम्बोसिस) तयार होतात. त्यामुळे रक्तप्रवाहात अडथळा येऊन हृदयघात, ब्रेन हॅम्रेज, लकवा, कोरोनासारखे गंभीर आजार होऊन अनेकदा प्राण गमवावे लागतात.

रक्त पातळ करण्यासाठी अनेक महागड्या औषधी बाजारात उपलब्ध आहेत. पण, त्या औषधांचे अनेकदा शरीरावर दुष्परिणाम सुद्धा होण्याची शक्यता असते. मात्र या गंभीर आजारांवर मात करण्याच्या दृष्टीने, अत्यंत महत्वाचा ठरणारा उपाय अर्थात रक्तात गाठी तयार होण्यास प्रतिबंध करणारे संशोधन वणीतील भावी शास्त्रज्ञ कु. देवयानी येनुरकर हिने केले आहे.

या संशोधनामुळे येणाऱ्या काळात वैद्यकीय क्षेत्रात मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कु. देवयानीने केलेल्या या संशोधनामुळे देशातील लाखो-करोडो लोकांना रक्तप्रवाहातील गाठींमुळे होणाऱ्या विविध समस्यांमधून सुटका होण्यास मदत होऊ शकते. कु.देवयानीचे कौतुक करावे तेवढे कमीच ठरते.

यवतमाळ जिल्ह्यातील वणी शहरालगतच्या चिखलगाव येथील मंगेश येनूरकर यांची कन्या कु. देवयानी येनुरकर हिने बारावीनंतर बी.फॉर्म त्यानंतर एम.फॉर्म आणि त्यानंतर बायोमेडिकल इंजिनियर आणि सध्या वाराणसी येथील काशी हिंदु

## हृदयविकार, ब्रेन हॅम्रेज, लकवासह गंभीर आजारांना थांबविता येणार



विद्यापीठात पीएच.डी.करीत आहे. पोटॅशियम फेरीक ऑक्सलेट नॅनोकणांचे संशोधन यशस्वीपणे पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे.

संशोधन पथक प्रमुख डॉ. सुदीप मुखर्जी यांच्या नेतृत्वात देवयानी येनुरकरने पीएच.डी.दरम्यान रिसर्च करीत रक्तप्रवाहात गाठी तयार होण्यापूर्वीच थांबविण्याचा शोध लावला आहे. हा अभ्यास आणि प्रक्रिया प्रारंभी ॲनिमल आणि नंतर ह्यूमन सॅम्पलवर केल्या जाते. हे संशोधन सद्यस्थितीत पूर्णत्वास जाण्याच्या स्थितीत असून रिजल्ट खूप चांगले व समाधानकारक असल्याने कु. देवयानी सुध्दा समाधानी आहे.

मानव प्रजातीवर परीक्षण, पेटंट, आणि उत्पादन प्रक्रियेनंतर बाजारात हे औषध उपलब्ध होणार आहे. हे संशोधन थ्रोम्बोसिस म्हणजेच रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताच्या गाठी तयार होऊन, रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होणाऱ्या गंभीर आजारावर उपयुक्त ठरणार आहे.

शरीरातील रक्त वाहिन्यांमधील रक्तगाठींमुळे अनेकदा विविध प्रकारच्या समस्या निर्माण होऊन वेळप्रसंगी रूग्णांसाठी अघटित प्रसंग सुध्दा ओढऊ शकतात. परंतु, देवयानी येनुरकरने पी.एच.डी.च्या विषयांतर्ग केलेल्या संशोधनाच्या औषधाने शरीरातील रक्त घट्ट होऊन त्याच्या गाठी तयार होणार नाहीत. परिणामी एकप्रकारे हृदयघात, ब्रेन हॅम्रेज, लकवा एवढेच नव्हे तर कोरोना सारख्या भयंकर रोगाने जी प्राणहानी होते, त्याला थांबविण्यासाठी देवयानीचे संशोधन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या संशोधनातून निर्माण होणारे पेटंट अत्यल्प दरात उपलब्ध होणार असल्याने हे जनहितार्थ महत्वपूर्ण ठरणार आहे. सद्यस्थितीत हे संशोधन शेवटच्या टप्प्यात असून, हे संशोधन बाजारात उपलब्ध करण्यासाठी विविध विभागांचे परवाने आवश्यक आहे. त्याची पूर्तता करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच कंपन्यांशी चर्चा सुध्दा सुरु आहे.

या उल्लेखनीय कामगिरीतून वणी शहराचे नाव जागतिक स्तरावर उंचावल्याबद्दल, येथील श्री संताजी ज्ञान प्रसारक मंडळाच्यावतिने कु. देवयानी मंगेश येनूरकर हिचा सन्मान करण्यात आला. यावेळी कु. देवयानीचे वडील मंगेश येनूरकर, आई गौरी येनुरकर सह धनंजय आंबटकर, तानाजी पाऊनकर, ओमप्रकाश निमकर, संजय पोटदुखे, दिलीप पडोळे, विवेक बुटले, शैलेश आडपावार उपस्थित होते.